विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१३ |
| वर्ष | : | अठ्ठेचाळिसावे |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१२**

**गणपत्रिका क्रमांक : १७६**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष अठ्ठेचाळिसावे/अंक दुसरा/ज्येष्ठ-आषाढ शके १९३५, जुलै २०१३

## *संपादकीय*

### हतबल केदारनाथ

उत्तराखंडात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेला हाहाःकार हा सध्या चर्चेचा विषय आहे. नैसर्गिक आपत्ती या कधीच सांगून येत नसतात आणि इतिहासात अशा शेकडो आपत्तींची नोंद आहे. उत्तराखंडामधील या भीषण आपत्तीची तीव्रता ही मानवाने अनेक नैसर्गिक स्रोतांमध्ये केलेल्या हस्तक्षेपामुळे वाढली, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. जागतिक स्तरावर तापमानामधील बदल हा गेल्या अनेक शतकांमधील मानवी हस्तक्षेपामुळे आहे हे आता विज्ञानाने मान्य केले आहे. हा मानवी हस्तक्षेप म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार, असंतुलित वापर. समाजाला या संबंधात माहिती व्हावी म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये पर्यावरण शास्त्राचा अंतर्भाव केला आहे. पण पुराणातील ही वांगी पुराणातच राहिली. आपल्या चंगळवादी जीवनशैलीत बदल होत असेल तर जीवनशैली अधिकच चंगळवादी होण्याकडे होत आहे. कोणा विचारवंताने म्हटल्याप्रमाणे माणसाच्या गरजे करता निसर्गात भरपूर आहे, पण हव्यासामुळे फक्तविनाशच आहे. आजकाल होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींची वाढणारी तीव्रता हे याचे उदाहरण आहे.

उत्तरेकडील केदारनाथ, बद्रिनाथ इत्यादी तीर्थस्थाने ही हिंदूंची मोठी श्रद्धास्थाने आहेत. वास्तविक भारताच्या पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या सर्व ठिकाणी असे धाम आहेत. गृहस्थाश्रम संपल्यावर सर्वसाधारणपणे अशा धामांची यात्रा हे गेली काही शतकेच नाही तर सहस्त्र वर्षे हिंदू श्रद्धने करत आले आहेत. आपल्या देशभ्रमणाबरोबरच इतर भौगोलिक क्षेत्रांमधील सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीचीही यामुळे ओळख पटत होती. उत्तर आयुष्यामध्ये अधिक अंतर्मुख होण्याकरता लागणारा निवांतपणा आणि संधीही यामुळे प्राप्त होत असे. आजच्या 'सहल' या संकल्पनेचा त्यामध्ये लवलेशही नव्हता. केदारनाथ, बद्रिनाथ या डोंगराळ भागांत धामे असणाऱ्या या गावांची नवीन नागरिकांना सामावून घेण्याची क्षमता सिमितच होती. पण या धामांना जेव्हा पर्यटन स्थळांचे स्वरूप मिळाले, तेव्हा तेथील मानवी गरजांच्या क्षमतांची वाढ होऊ लागली. रस्त्यांपासून निवासांपर्यंत ही वाढ होत असताना ती

(पृष्ठ क्र. ३२ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यांत प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षांकरता)
परदेशस्थ सभासदांना १२५ डॉलर्स. पहिली आजीव सभासद योजना १९७६ ते १९७८ पर्यंत होती. त्याकरता देणगी फक्त २५ रु. होती. (त्या वेळी वार्षिक देणगी २ रु. होती.) काही तांत्रिक कारणाने ती योजना बंद करावी लागली. पुन्हा एप्रिल १९९८ ते मार्च २००० पर्यंत आजीव सभासद योजना अस्तित्वात होती. याकरता ५०० रुपये देणगी होती. गेल्या काही वर्षांपासून महागाई उत्तरोत्तर वाढत आहे. यामुळे ही योजना एप्रिल २००९ पासून बंद करण्यात आली व नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरू करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदांनी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करून आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह), पूर्ण पत्ता (पिन कोडसह), सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | शाखा क्रमांक | खाते क्र. |
|---|---|---|---|
| भारतीय स्टेट बँक | जे के ग्राम, ठाणे (प.) | ९०५६ | १०८८४४९३००९५५ |
| ठाणे जनता सहकारी बँक | खोपट, ठाणे(प.) | | १६६८९ |
| ठाणे भारत सहकारी बँक | मुख्य शाखा, नौपाडा, ठाणे(प.) | | २४५२० |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावेत.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनीवरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणीही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगाव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८ ०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. या ठिकाणी मनीऑर्डर किंवा धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे -४००६०१. दूक्र : २५४७२००५, भ्रक्र:९८१९६९३१९५

अंकाच्या पाकिटाच्या पत्त्यावर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' यांच्यापुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष दिले आहे.

- संपादक

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार (लेख १५ वा) | ४ |
| स्थितप्रज्ञ | ६ |
| अष्टावक्र गीता (लेखांक – २) | १० |
| अध्याय १२ : सगुण भक्तियोग | १७ |
| चाले दिंडी पंढरीला | १८ |
| दास बोधातील निवडक ओव्या | १९ |
| मानवी जीवनात धर्म व विज्ञानाची आवश्यकता | २० |
| वैदिक वाङ्मयाचा विस्तार व त्यात उपनिषदांचे स्थान व गीतेचे महत्त्व (उत्तरार्ध) | २५ |


**इतर सूचना :**

जुने सद्धर्मचे अंक, देणगीदार व वाचकांसाठी संकेत स्थळ www.granthalaya.org येथे, PDF स्वरूपांत उपलब्ध आहेत व ते छापताही येतात. त्याचा सर्वांनी फायदा घ्यावा.

या अंकांतील लेखांतील व लेखकांचे विचाराशी व विश्वस्त सहमत असतीलच असें नाही. या त्रैमासिकांत प्रसिद्ध झालेला मजकूर संपादकांच्या लेखी परवानगी शिवाय इतरत्र छापू नये. लेखकांस विनंती आहे कीं इतर प्रसिद्धी साठी इतरत्र पाठविणे असल्यास, तो सद्धर्मच्या अंकात प्रसिद्ध झाला होता हयाचा उल्लेख करणे आवश्यक आहे,तो तसा होईल ही अपेक्षा.

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ५० |

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

**एप्रिल २०१३ ते जून २०१३**
**दीर्घकालिन देणगीदार : रुपये १०००/–**

१. श्री. पुरुषोत्तम कृष्णाजी माने, बेळगाव

**विशेष देणगी :**

ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे रु. २०,०००/–

वरील सर्व देणगीदारांचे आम्ही आभारी आहोत. धन्यवाद.

**– संपादक**

लेख १५ वा

**अङ्गीकृतं सुकृतिनः परिपालयन्ति ।।**[२३९]

सज्जनांनी स्वीकारलेल्या कार्याचा ते कधीही त्याग करीत नाहीत. शेवटपर्यंत ते कार्य करीत राहतात, पूर्णतेस नेतात.

संपूर्ण सुभाषित :–

**अद्यापि नोज्झति हरः किल कालकूटं**
**कूर्मो बिभर्ति धरणीं खलु पृष्ठभागे ।**
**उम्भेनिधिर्वहति दुस्तरवडवाग्निम्**
**अङ्गीकृतं...................... ।।**

कंठात धारण केलेले जहाल विष शंकर अजूनही टाकून देत नाही. कासवसुद्धा अजूनही पृथ्वीचा भार पाठीवर सहन करीत आहे. समुद्रसुद्धा वडवाग्नीला पोटात अजूनही बाळगून आहे. सज्जन लोक एकदा स्वीकारलेले व्रत टाकीत नाहीत.

**अकाले कृत्यमारब्धं कर्तुरनर्थाय कल्पते ।**[२४०]

अवेळी सुरू केलेले कार्य (एखाद्या वेळेस) करणाऱ्याच्या नाशाला कारणीभूत होते.

सुभाषिताची दुसरी ओळ :–

**तदेव काल आरब्धं महतेऽर्थाय कल्पते ।।**

पण तेच जर योग्य वेळी सुरू केले तर त्यापासून फार मोठा फायदा होतो. व्यायाम लहानपणापासून नित्यनेमाने केला तर आयुष्यभर हितकारक ठरतो, पण तोच जर व्याधिजर्जर म्हातारपणी करायला सुरुवात केली तर काय होईल सांगणेच नको.

**अपसपति पुष्टस्तु तस्मात्तस्य नोचितम् ।।**[२४१]

गरज सरो वैद्य मरो, न्याय जगाचा, निवडून आल्यावरती कोण कुणाचा?

सुभाषिताची पहिली ओळ :–

**क्षीणः क्षीणो भवंश्चन्द्रो मित्रं समुपसर्पति ।।**

अत्यंत क्षीण झालेला चंद्र अमावास्येला सूर्याजवळ जातो (अमावास्येला सूर्य व चंद्र एकत्र असतात) आणि पुष्ट झाल्यावर तो तिथून सूर्यापासून दूर जातो. हे तो योग्य करीत नाही.

अमावास्येला सूर्य आणि चंद्र पूर्वेकडे असतात. प्रतिपदेपासून चंद्र निघून जातो व संध्याकाळी पश्चिमेला दिसतो. ह्या कल्पनेवर हे सुभाषित आधारित आहे.

**अत्यादरो भवेद्यत्र कार्यकारणवर्जिताः ।**[२४२]
**तत्र शङ्का प्रकर्तण्या परिणामे सुखावहा ।।**

हे संपूर्ण सुभाषितच म्हणीसारखे आहे पाहाः– ज्या ठिकाणी काहीच कारण अथवा काम नसताना जास्त आदर दाखविला जातो तेथे जरूर शंका घ्यावी कारण अशी शंका घेणे (येणे) परिणामी फायद्याचे ठरते.

**सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता ।**[२४३]

सुख किंवा दुःख कोणी कोणाला देत नाही.

सुभाषिताच्या पुढील ३ ओळी :–

**परोददातीति कुबुद्धिरेषा ।**
**अहं करोमीति वृथाभिमानः ।**
**स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ।**

सुख किंवा दुःख देणारा कोणी नसतो. दुसरा आपल्याला सुख किंवा दुःख देतो ही आपली चुकीची विचारसरणी आहे. सर्व काही मी करतो हा तर केवळ खोटा अभिमान आहे. लोक स्वतःच्या कर्मरूप सूत्रात बांधलेले असतात.

मागच्या जन्मीच्या संचितानुसार ह्या जन्मामध्ये आपल्याला सुख किंवा दुःख मिळते. पूर्वकर्मानुसार ते मिळते. इतर कोणीही त्याला कारणीभूत नसतो.

**चिता चिंता समे प्रोक्ते बिन्दुमात्रं विशेषतः ।**[२४४]

चिता व चिंता ह्या दोघी सारख्याच आहेत. फक्त दोघींत एकाच अनुस्वाराचा फरक आहे. सुभाषिताची दुसरी ओळ :-

**सजीवं दहते चिंता, निर्जीवं दहते चिता ।।**

जिवंत माणसाला चिंता जाळते आणि मृताला चिता.

**आत्मनः प्रतिकुलानि परेषां न समाचरेत् ।।**[२४५]

आपल्याला जे प्रतिकूल आहे ते आपण दुसऱ्याच्या बाबतीतही आचरू नये.

सुभाषिताची पहिली ओळ :-

**आत्मवतसततं पश्येदपि कीटपिपीलिकम् ।**

आपला जसा जीव तसाच इतर प्राणिमात्रांचाही ही भावना ठेवावी.

**ईश्वरे च दरिद्रे च मृत्योः सर्वत्र तुल्यता ।।**[२४६]

श्रीमंत असो वा गरीब असो, मृत्यू सर्वांनाच सारखा.

पहिली ओळ :-

**पण्डिते चैव मूर्खे च, बलवत्यपि दुर्बले ।**

मनुष्य विद्वान असो किंवा मूर्ख असो, बलवान असो की दुबळा असो, मृत्यू कोणत्याच प्रकारे भेदभाव मानीत नाही.

**आकण्ठजलमग्नोऽपि श्वान लिहत्येव जिह्वया ।।**[२४७]

प्रचंड पुरामध्ये गळ्यापर्यंत बुडलेला जरी कुत्रा असला तरी तो जिभेने चाटूनच पाणी पितो. पहिली ओळः-

**उपभोक्तुं न जानाति श्रियं प्राप्यपि मानवः ।**

कितीही वैभव प्राप्त झाले तरी त्याचा योग्य उपभोग (विनिमय) कसा करावा हे माणसाला कळत नाही.

**चाण्डाले मरणान्तिकः ।**[२४७]

हीन कुळातील माणसांचा राग मरेपर्यंत असतो.

संपूर्ण सुभाषित :-

**उत्तमे तु क्षणं कोपो, मध्यमे घटिकाद्वयम् ।**
**अधमे स्यादहोरात्रं, चाण्डाले मरणान्तिकः ।।**

इति शम् ।

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३ ,
सत्संग आश्रमासमोर,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

अर्जुनाच्या मनात लाखो लोकांना मारणे, त्याचे पाप आणि त्या सैनिकांच्या मृत्यूचे दूरगामी परिणाम यांबद्दलच्या विचारांनी काहूर माजले होते. आत्म्याच्या अमरत्वाबद्दल आणि नित्यत्वाबद्दल सांगून भगवंतांनी प्रथम त्याचे मन शांत केले. त्यानंतर सुख-दुःख, लाभ-हानी, जय-पराजय हे सारखेच मानून युद्ध कर म्हणजे पाप लागणार नाही असे सांगितले. पुढे असेही सांगितले की विद्वान लोकांनी वेदवचनांचे आपल्या बुद्धीप्रमाणे लावलेले वेगवेगळे अर्थ ऐकून तुझी बुद्धी चंचल झाली आहे. ती जेव्हा स्थिर होईल तेव्हाच तुला समत्वबुद्धीने विचार करता येईल.

यावर अर्जुनाने विचारले आहे की समाधी अवस्थेत असलेला स्थितप्रज्ञ योगी कसा ओळखावा, समाजात वावरताना तो कसा बोलतो, कसा राहतो आणि समाजात मिसळून कसा वागतो?

येथे समाधिस्थ म्हणजे आजूबाजूचे भान विसरून आत्मानंदात मग्न असलेला असा नाही. तो समाजात वावरतो आहे म्हणजे तो **योगसमाधीत** नाही. तो **ज्ञानसमाधीत** आहे. त्याची धी म्हणजे बुद्धी समा झालेली आहे. तो समत्व बुद्धियोगी झाला आहे. म्हणून तो समाजात मिसळून आपले व्यवहार करू शकत आहे.

स्थितप्रज्ञ हा खास गीतेचाच शब्द आहे. विशेष म्हणजे तो प्रथम अर्जुनाच्या तोंडी आला आहे. अर्जुनाची चौरस बुद्धी अध्यात्माच्या क्षेत्रातही संचार करू शकते हेच यावरून उघड होते. गीता ऐकण्यासाठी अर्जुनाचीच निवड करण्यामागे हेही एक कारण असू शकते.

स्थितप्रज्ञ या विषयासाठी गीतेत अध्याय २ मधील श्लोक क्र. ५४ ते ७२ असे १९ श्लोक वापरले आहेत. श्लोक ५४ हा अर्जुनाचा प्रश्न आहे. श्लोक ५५ ते ६८ यांत स्थितप्रज्ञ लक्षणे आणि स्पष्टीकरण आहे आणि श्लोक ६९ ते ७२ यांत विषयाचा समारोप आहे.

**स्थितप्रज्ञाची लक्षणे** सांगताना श्रीभगवान सांगतात :

**श्लोक ५५ :** मनातल्या सर्व कल्पनांचा, कामनांचा त्याग करून जो आपल्या अंतरात्म्यातच संतुष्ट असतो त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.

मनात कसलीही इच्छा नाही अशा मोकळ्या मनात फक्त आत्माच असल्यामुळे योग्याला अवर्णनीय असा आत्मानंद मिळत असतो व त्यातच तो परम संतुष्ट असतो.

**श्लोक ५६ :** दुःखाने ज्याचे मन उद्विग्न होत नाही, सुखाबद्दल जो निःस्पृह आहे आणि ज्याने प्रीती, भीती आणि क्रोध यांचा त्याग केला आहे त्याला स्थितप्रज्ञ मुनी म्हटले जाते.

प्रत्येकाला सुख हवे असते आणि दुःख नको असते. पण त्यांचे मिळणे न मिळणे आपल्या हातांत नसते. तरीही येणारे सुख अथवा दुःख हे ईश्वरी इच्छेनेच येत आहे असे समजून ते सारख्याच भावनेने स्वीकारतो तो स्थितप्रज्ञ.

**श्लोक ५७ :** जो सर्व बाबतींत अनासक्तआहे, ज्याला शुभ प्रसंगांचा वेगळा आनंद नाही आणि अशुभ प्रसंगांचा तिरस्कार वाटत नाही त्याची बुद्धी स्थिर असते. येणारा प्रत्येक प्रसंग व मिळणारी वस्तू ही ईश्वरी इच्छेनेच समोर येत असल्यामुळे योग्याला कसलीही आसक्ती नसते. सुखद प्रसंग यावेत असाही त्याचा आग्रह नसतो आणि

दुःखाचे प्रसंग येऊ नयेत असेही तो म्हणत नाही. समबुद्धी झाल्यामुळे या दोन विरुद्ध टोकांच्या प्रसंगांतसुद्धा त्याच्या मनात चलबिचल, अस्वस्थता उत्पन्न होत नाही.

**श्लोक ५८ :** कासव ज्याप्रमाणे आपले अवयव आत ओढून घेते त्याप्रमाणे जो आपल्या इंद्रियांना त्यांच्या विषयांपासून आवरून ठेवतो त्याची बुद्धी स्थिर झालेली असते. स्थितप्रज्ञ बनण्यासाठी काय करावे लागते ते यात सांगितले आहे. ही एक प्रकारे संरक्षणात्मक प्रतिक्रिया आहे.

कासवावर काही संकट आले तर ते आपले अवयवच आत ओढून घेते. संकटाचा प्रतिकार करीत नाही. त्याचप्रमाणे विषय समोर आले असताना मन, इंद्रिये आणि ते विषय यांच्या तिहेरी संघर्षात न पडता जो आपल्या इंद्रियांवरच ताबा ठेवून त्यांना आवरून धरतो तो स्थितप्रज्ञ.

**श्लोक ५९ :** साधक निराहारी असेल तर भोग्य वस्तूंकडे त्याचे लक्ष कमी असते. मात्र मनात त्या वस्तूंची ओढ शिल्लक असतेच. ईश्वरी साक्षात्कारानंतर ती ओढही संपून जाते. येथे आहाराचा अर्थ अन्नाशी निगडित नाही. इंद्रियांचे विषय समोर आल्यानंतर इंद्रियांना त्यांचा आहार न देणे, इंद्रियांना आवरून ठेवणे, असा आहे. काय करावे ते या श्लोकात सांगितले आहे. पण प्रत्यक्षात काय घडते ते पुढील श्लोकांत आले आहे.

**श्लोक ६० :** इंद्रियांना आवरण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्ञानी पुरुषाचे मनसुद्धा ही बलवान इंद्रिये आपल्याकडे वळवून घेतात. इंद्रियांना त्यांच्या विषयांची निसर्गतः ओढ असते. म्हणून मनावर जबरदस्ती करून मन व बुद्धी आपल्याकडे आकर्षून घेतात. त्यांच्या मदतीने आपल्या विषयांचा भोग घेण्याकडे इंद्रियांचा कल असतो. असे होऊ नये म्हणून काय करावे ते लगेच सांगितले आहे.

**श्लोक ६१ :** त्या सर्व इंद्रियांना आपल्या ताब्यात आणून फक्त माझ्याच चिंतनात मग्न असावे. कारण ज्याचा इंद्रियांवर ताबा असतो त्यांची बुद्धी स्थिर असते.

''युक्त आसीत मत्परः'' युक्त म्हणजे जोडलेला आणि मत्परः म्हणजे सर्व काही मीच आहे असे मजून आपले मन आणि बुद्धी मला अर्पण केलेला. असा योगी जे काही करील ते स्वतः भगवंतच करीत असतो. कारण काही करण्यासाठी त्या भक्ताजवळ स्वतःची अशी बुद्धीच नसते.

या मार्गात येणाऱ्या अडचणी पुढे सांगितल्या आहेत.

**श्लोक ६१–६२ :** ज्या गोष्टीचे मनात सतत चिंतन चालू असते तिच्याबद्दल आवड व आसक्ती उत्पन्न होते. आसक्तीतून इच्छा निर्माण होतात. इच्छांमुळे मनःक्षोभ. क्षोभामुळे मन संभ्रमित होते. त्यामुळे स्मृतिभ्रंश होतो. स्मृतिभ्रष्ट झाल्यानंतर बुद्धिनाश आणि शेवटी सर्वनाश होतो.

बुद्धिनाश म्हणजे बुद्धी नष्ट होत नाही. ती योग्य मार्गाने वापरली जात नाही. आपल्या अयोग्य वागण्याचे समर्थन करण्यासाठी ती अधिक तीव्र बनते. प्रणश्यति म्हणजे साधनामार्गातून भ्रष्ट होतो. साधकाचा सामान्य मनुष्य बनतो.

प्रत्येक दिसणारी वस्तू मनावर परिणाम करते. सातत्यामुळे आसक्ती व त्यातून इच्छा. इच्छा पूर्ण झाल्या अथवा न झाल्या तरीही मनःक्षोभ होतो. नंतर बुद्धी बोथट होते. त्यामुळे स्मृतीभ्रष्ट होते. योग्य काय व अयोग्य काय ते बुद्धीला ठरवता येत नाही.

अर्जुनाला या सर्व मालिकेतून जावे लागले. कौरवांशी सतत संपर्क, त्यामुळे आपलेपणाची भावना  नंतर तेच शत्रू म्हणून समोर आल्यामुळे मनःक्षोभ, संभ्रमावस्था व कर्तव्याची विस्मृती. शेवटी त्याची बुद्धी युद्ध टाळण्याचा विचार करू लागली. अशा वेळी त्याला श्रीकृष्णासारखा गुरू लाभला आणि अर्जुन सर्वनाशापासून सावरला व ''नष्टो मोहः स्मृतिः लब्धा'' या अवस्थेपर्यंत आला.

श्रीभगवंतांचा असा कृपाप्रसाद कोणाला मिळतो ते यानंतर सांगितले आहे.

**श्लोक ६४ :** आसक्ती आणि द्वेष या विकारांपासून जो मुक्त आहे, ज्याचा इंद्रियांवर ताबा आहे आणि जो सतत माझ्याच चिंतनात आहे असा योगी भगवंतांच्या कृपाप्रसादाला पात्र बनतो.

मन व इंद्रिये ताब्यात असल्यामुळे जरी इंद्रिये त्यांच्या विषयांत फिरत असली तरी आसक्ती अथवा द्वेष हे विकार उत्पन्न होत नाहीत. अशा स्वाधीनअंतःकरण पुरुषाला मनःक्षोभ होण्याऐवजी मनाची निर्मलता आणि प्रसन्नता लाभते.

**श्लोक ६५ :** मन प्रसन्न असल्यावर सर्व दुःखांचा परिहार होतो आणि अंतःकरण प्रसन्न असध्यावर योग्याची बुद्धी ईश्वराच्या ठायी लवकर स्थ्रि होते.

सामान्य मनुष्य अपेक्षा, आसक्ती यांतच दंग असतो व त्याचे पर्यवसान मनःक्षोभ आणि कोणाचातरी मत्सर, द्वेष यांतच होते. पण या दोन टोकांच्या विकारांवर ताबा मिळवणारा योगी नेहमी शांत असतो. त्याला समत्वबुद्धी प्राप्त होते. अशी बुद्धी योग्य विचार करते आणि ईश्वराच्या ठायी लवकर स्थिर होते.

**श्लोक ६६ :** ईश्वराशी मनाने जोडलेला नसेल तर त्याला बुद्धी नसते. ईश्वरशरण भावना नसते. त्यामुळे त्याचे मन शांत नसते. अशा अस्वस्थ माणसाला सुख कसे मिळणार?

बुद्धी नसते म्हणजे सारासार विवेक नसतो. त्याचे विचार ईश्वराऐवजी अन्य काम्य विषयांकडे वळतात. त्याला भावनासुद्धा असतात. पण त्या भौतिक वस्तूंबद्दल असतात. अशा माणसाला शाश्वत शांती आणि मानसिक सुख मिळत नाही.

विवेकबुद्धी जागृत असेल तर मनावर ताबा मिळवता येतो. ईश्वराशी मनाने जोडला जातो. ईश्वरभक्तीही होते. मन प्रसन्न राहते. मानसिक शांती आणि सुख प्राप्त होते.

**श्लोक ६७ :** पाण्यात असलेली नाव, वारा आपल्याबरोबर खेचून नेतो. त्याप्रमाणे आपपल्या विषयांत रमणाऱ्या इंद्रियांच्या मागे जर मनसुद्धा धावत असेल तर ते मन बुद्धीलासुद्धा आपल्याबरोबर येण्यास भाग पाडते.

जर बुद्धी ईश्वराशी जोडलेली नसेल तर ती मनाला आवरू शकणार नाही. परिणामी ते बेताल मन, इंद्रिये आणि त्यांचे विषय यांच्यामागे धावणार. युक्तत्व असेल तर आत्मतत्त्वाचा बुद्धीवर,  बुद्धीचा मनावर आणि मनाचा सर्व इंद्रियांवर ताबा राहू शकतो. अन्यथा अध्यात्ममार्गातून अधःपतन होते.

**श्लोक ६८ :** म्हणून हे महाबाहो अर्जुना, ज्याची इंद्रिये त्यांच्या विषयांपासून निग्रहपूर्वक आवरून घेतलेली असतात त्याची बुद्धी स्थिर राहते. ज्ञानेंद्रियांकडून मेंदूकडे संवेदना जातात व मेंदूकडून कर्मेंद्रियांना संदेश दिले जातात. अंतःकरणचतुष्टय मेंदूला माहिती पुरवते. त्यांतील बुद्धी ही ईश्वराला सर्वांत जवळची. ''यो बुद्धेः

परतस्तु सः'' म्हणून बुद्धीवर सर्वप्रथम ताबा असेल तर पुढची सर्व कार्ये सुरळीत चालतील व साधक योग्य मार्गावर राहील.

सामान्य माणूस आणि स्थितप्रज्ञ यांच्यात काय वेगळेपण असते ते पुढील श्लोकांत सांगितले आहे.

**श्लोक ६९ :** सामान्य भूतमात्रांसाठी जी रात्र असते त्या वेळी संयमी मुनी जागा असतो. ज्या वेळी सर्व भूतमात्र जागृतावस्थेत असतात ती वेळ ज्ञानी मुनीच्या दृष्टीने रात्र असते.

योगी पुरुषाला ईश्वरी ज्ञान झालेले असल्यामुळे तो सतत त्या ज्ञानाच्या प्रकाशातच वावरत असतो. जगण्यासाठी धडपड करणारे सर्व जीवमात्र अज्ञानाच्या अंधकारात आपली सर्व कर्मे करीत असतात. त्यामुळे योग्याला ती त्यांची रात्रच वाटते. कारण अज्ञानी जिवांना न दिसणारा ज्ञानाचा प्रकाश तो योगी तेव्हासुद्धा पाहत असतो. सामान्य माणसाला ज्या गोष्टींची आसक्ती असते त्या सर्व गोष्टींसंबंधी योगी मुनी उदासीन असतो. याच्या विपरीत आपल्या ''स्व''ची, आपल्या आत्म्यासंबंधीची माहिती, ज्ञान मिळवण्यासंबंधी सामान्य मनुष्य उदासीन असतो.

**श्लोक ७० :** सागरात सर्व नद्यांचे पाणी सतत प्रवेशत असते. तरीही त्याची विस्तारमर्यादा अचल, कायम असते. त्या मर्यादेत काही बदल होत नाही त्याचप्रमाणे ज्याच्या मनात सर्व विकार प्रवेश करतात आणि तरीही ज्याच्या मनाची चलबिचल होत नाही त्याला शांती प्राप्त होते. ज्याच्या मनावर विकारांचा पगडा बसतो त्याला शांती लाभत नाही.

मनात विकार उत्पन्न होणारच. ज्याच्या मनात विकारांमुळे चलबिचल होते तो सतत अस्वस्थ राहतो. ज्याचे मन स्थिर राहते त्याला मनःशांती लाभते.

यानंतरच्या श्लोकांत तीन शब्दांत या विषयाचे सार सांगितले आहे.

**श्लोक ७१ :** जो पुरुष सर्व कामनांचा त्याग करून निःस्पृह, निर्मम व निरहंकारी बनतो त्याला शांतिलाभ होतो.

**निःस्पृह** म्हणजे इच्छारहित. जे मिळेल ते स्वीकारणारा.

**निर्मम** म्हणजे मी, माझे संपलेले आहे असा. त्याला स्वतःच्या देहाबद्दलही ममत्व वाटत नाही.

**निरहंकार** म्हणजे निर्मम अवस्था आल्यानंतर कशाबद्दलही आपुलकीची भावना मनात येत नाही. बुद्धी ईश्वरात स्थित असते. त्यामुळे जे काही कर्म घडते ते ईश्वरच करीत असतो. ईश्वरच सर्व काही आहे अशा श्रद्धेने योगी ईश्वरी आनंदातच मग्न असतो. त्याच्या मनात अहंकाराची भावना येतच नाही.

**श्लोक ७२ :** अशी ब्रह्मस्वरूप अवस्था प्राप्त झाल्यानंतर योगी कसल्याही मोहांत फसण्याची शक्यताच उरत नाही. अंतकाळपर्यंत याच अवस्थेत राहून शेवटी मृत्यूनंतर त्या योग्याला ब्रह्मनिर्वाण लाभते म्हणजे त्या योग्याला मोक्षप्राप्ती होते.

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

**वा. प. पटवर्धन**
द्वारा सौ. जया धनपाल शहा
ए -१/११ श्री महावीर नगर,
आयकॉन हॉस्पिटलसमोर,
मानपाडा,
डोंबिवली पूर्व - ४२१२०१

●●●

# अष्टावक्र गीता

(लेखांक - २)

कै. शं. बा. मठ

अष्टावक्रांच्या आत्मबोधाने जनकाला ज्ञान झाले. आपण इतके दिवस मोहाने पछाडून गेलो होतो, याचे त्याला आश्चर्य वाटू लागले. जनक अष्टावक्रांना म्हणतो - हे मुने, मी सगळ्या उपाधिरहित, ज्ञानस्वरूप आणि विकाररहित आहे. मायेच्या पलीकडे गेल्यामुळे अज्ञानाचा नाश झाला आहे; आता मी ज्ञानरूप झालो आहे. हे गुरो, आता मी आत्मानंदाला प्राप्त झालो आहे. अहो अहं बोधः शान्तः निरंजनः प्रकृतेः परः ।२.१

गुरू अनेक प्रकाराने शिष्याला अनुग्रहित करत असतो. उपदेश, स्पर्श, नेत्रकटाक्ष आणि आलिंगन, उद्धव गीता हे उपदेशाचे उदाहरण म्हणून सांगता येईल. रामकृष्णांनी प्रथम स्पर्शाने व शेवटी आलिंगनाने नरेंद्राला ज्ञान दिले. केवळ नेत्रकटाक्षाने शिष्यात ज्ञान संक्रमित करता येते याची सांप्रतकाळीसुद्धा अनेक उदाहरणे पाहावयास मिळतात. केवळ नेत्रकटाक्षाने शक्तिपात म्हणजे कुंडलिनी शक्ती जागृत केली जाते. इथे अष्टावक्राच्या उपदेशामुळे जनकाला ज्ञान झाले.

जनकाला असे वाटू लागले, मी साऱ्या जगाचा तसेच या स्थूल देहाचाही, प्रकाशक आहे. मीच सर्व जगत आहे. माझ्यावाचून अन्य काहीच नाही. मतः परतरं नान्यत् किंचिदस्ति-(गीता) आत्म्याहून जग वेगळे नाही. पंचदशीत असा उल्लेख आहे - अस्ति भाति प्रियं रूपं नामच इति अंश पंचकम् । आद्य त्रयं ब्रह्मरूपं जगत् रूपं ततो द्वयम् । असणे, भान होणे, प्रिय वाटणे, आकार असणे, बोधशब्द असणे, या पाच अंशांनी हे सारे विश्व विनटले आहे. पहिले तीन अंश ब्रह्माचे आहेत व शेवटचे दोन अंश जड जगताचे आहेत. हे तीन अंश त्या दोन अंशांत प्रविष्ट होतात. शेवटचे दोन अंश नाम व रूप विनाशी आहेत. केवळ ब्रह्म अंश - अस्ति, भाति, प्रिय तेवढेच शाश्वत यामुळे जगत सत्य आहे असे भासते. हे तीनही अंश बाजूला झाल्यास जगाचे सत्यत्व राहणार नाही. म्हणून जगत आभासमात्र, वास्तविक स्वरूपाचे, त्यातील ब्रह्मच सत्य व त्याचा संयोग कल्पित आहे.

राजाला आता वाटू लागले, दोनपणा मानणे हेच दुःखाचे मूळ आहे. दोनपणा केवळ भासमान होणारा असल्याने सत्य नव्हे. मी एकमेव अद्वितीय, एकरस, निर्मल चैतन्यमात्र आहे. वास्तविक आत्मा सत्यबोधरूप आहे हेच ज्ञान. हेच त्रिविध तापापासून निवृत्त करणारे औषध आहे. द्वैतमूलं अहो दुःखम् । एकोऽहं चित् रसः अमलः तस्य अस्ति भेषजम् । २.१६

अहो, माझ्यातच विश्व सामावले आहे. वस्तुतः ते तसे नाही. त्यामुळे मी बद्ध वा मुक्त दोन्ही नाही. माझी भ्रांती संपली व मी पूर्णांशाने केवळ (एकाकी) आहे. न मे बंधोस्ति मोक्षो वा भ्रान्तिः शान्ता निराश्रया । आनंदात्मक स्थिती म्हणजेच मोक्ष होय. मुक्ती ही अवस्था मानल्यास ती विनाशी ठरेल. कारण जे निर्माण होते त्याचा नाश ठरलेला. मी बद्धच नाही तर मुक्ती कशापासून? मी नित्य चैतन्यरूप आहे. मी देहभावनेने भ्रांत झालो त्यापासून निवृत्त होण्याचा

उपाय गुरू करतात. भ्रांत माणसाला गुरू आवश्यक आहे. असे जनकाने अष्टावक्रांना सांगितले.

अष्टावक्र जनकाला म्हणतात – तू आत्मस्वरूपाला जाणतोस, असे असताना तुला व्यावहारिक धनसंग्रह करावा असे का बरे वाटले? तू आत्मज्ञानी असूनही धनाबद्दल एवढी प्रीती का बरे तुझ्या ठिकाणी आढळते? जनका, वास्तविक आत्मज्ञानाच्या अभावामुळे विषयाबद्दल प्रेम भ्रमाने निर्माण होते व ते संग्रहित करण्याचा मोह होतो. आत्मज्ञान झाल्यामुळे धनसंग्रह करण्याने कोणता दोष निर्माण होतो या जनकाच्या प्रश्नाला उत्तर देताना अष्टावक्रांनी वरीलप्रमाणे त्याला विचारले व म्हणाले 'तत्त्वतः आत्मानं एकं विज्ञाय कथं अर्थार्जने रतिः।' आत्मज्ञानाने सर्व विषयांचा निरास होतो म्हणून विषयाकडे तुझी प्रवृत्ती होणे योग्य नव्हे. आत्मज्ञानासंबंधी नुसते खूप ऐकणे पुरेसे नसून मन आत्मज्ञानाकडे आकृष्ट झाले पाहिजे. आत्मज्ञान समजणे म्हणजे त्याप्रमाणे स्वतः अनुभव घेणे होय.

ज्ञानी त्याच्या स्वभावानुसार असेच जाणतो की या दृश्य विश्वाला वास्तवता नाही, त्यामुळे हे ग्रहणयोग्य आहे वा नाही असे त्याला जाणवतच नाही. इदं ग्राह्यं त्याज्यं स न पश्यति धरिधीः। पसारा केवळ दृश्यमय आहे, सत्य नाही. लाट दृश्य आहे, परंतु तिचे अस्तित्व दिखाऊ आहे. ज्ञानी माणसाचे अंतःकरण शुद्ध द्वंद्वरहित व निरपेक्ष असते. सहजरीत्या प्राप्त झालेले भोग त्याला आनंदित करीत नाहीत वा तापदायकही होत नाहीत. कारण त्याचे अंतःकरण पवित्र झालेले असते. यामुळेच साऱ्या द्वंद्वकल्पनेपासून तो मुक्त असतो. तो समचित असतो. यदृच्छया आगतो भोगो न दुःखाय न तुष्टये। ३.१४ दैववशात सहज प्राप्त झालेल्या भोगामुळे तो हरखून जात नाही वा नाखूशही होत नाही.

हे संपूर्ण विश्व आत्मतत्त्वानेच व्याप्त आहे, असे ज्ञानी समजतो. दृश्यमान सारे जगत आत्मरूपाहून भिन्न नाही हे ज्ञानी जाणून असतो. प्रारब्धवशात कर्मप्रवृत्त व कर्मनिवृत्त करण्यास कोण बरे समर्थ आहे? ते आपोआप प्रवर्तित वा रोधित होत असते म्हणून पाप अगर पुण्य यांचा संबंध तिथे नसतो. यदृच्छया वर्तमानं तं निषेद्धुः क्षमेत कः। ४.५

जनका, तू म्हणालास की आत्मा अनंत आहे. त्याग वा ग्रहण करणे ही कल्पना तुझ्यात नाही, ते तू योग्यच बोललास. चित्तात इच्छा झाली व ती प्राप्त न झाल्यास दुःख व संताप होतो. चित्तात लोभ निर्माण झाला, पुनः स्वीकार करण्याची इच्छा होते. अप्राप्तीमुळे संताप याप्रमाणे वासना निर्माण होताच चित्त बंधनात अडकते.

योगवासिष्ठात असा उल्लेख आहे. ''स्नेहेन धनलोभेन लाभेन मणि योषिताम्। आपात रमणीयेन चेतो गच्छति पीनताम्।'' प्रेमामुळे, धनलोभामुळे, रत्न आणि स्त्रीलाभामुळे या भुरळ पाडणाऱ्या आणि मोहक वस्तूंमुळे अंतःकरण पुष्ट होते. थोडक्यात वासनाच बंधात टाकतात. वासनेपासून सुटका म्हणजेच मोक्ष. मात्र मोक्षाचीही इच्छा करणे योग्य नाही. कारण चित्त त्या इच्छेने व्याप्त राहते. चित्त वासनेने (इच्छेने) व्याप्त राहते. तोवर मुक्ती कदापि नाही. वासनास्तवं परित्यज्य मोक्षार्थित्वं अपि त्यज।

चित्तात कसलीच वासना नसते तेव्हाच मोक्ष प्राप्त होाते. काही स्वीकारत नाही, काही नाकारत नाही, प्रमुदित होत नाही वा रागावत नाही. न मुंचति न गृण्हाति न हृष्यति न कुप्यति। ८.२ चित भोगाची अपेक्षा करते व दुःख टाळण्याची इच्छा करते. वस्तुप्राप्तीने सुख आणि प्रिय गोष्टींच्या वियोगाने दुःख मात्र या दोन्ही भावना टाकून नित्य प्रसन्न आणि आनंदी राहतो तोच पुरुष मोक्ष प्राप्त करतो.

कोणत्यातरी गोष्टीने चित्त आकर्षित होते तोच बंध होय. ज्या वेळी चित्त कशातही आसक्त होत नाही तोच मोक्ष होय. तदा मोक्षो यदा चित्तं असक्तं सर्व दृष्टिसु। ८.३ इथे बंध व मोक्ष यांची उत्पत्ती सांगितलेली आहे. विषयासक्त मन बंधनात अडकते आणि अनासक्त मन मुक्त असते. भाजलेले बीज उगवत नाही तसे संसारात पोळून विवेक प्राप्त झालेला माणूस बंधनात पडत नाही.

'मी' असा भाव आहे तोच बंध, 'मी' चा भाव नाहीसा होताच मोक्ष आहेच. माझ्यातच या हालचाली आहेत. काही टाकणे वा स्वीकारणे संभवत नाही. यदा नाहं तदा मोक्षः यदा अहं बंधनं तदा। अहंकाराने पूर्ण असणे तोच बंध. अहंकारविरहित म्हणजेच मोक्ष हेसहजगत्या हेजनका, समजून घे. तू आसक्ती वा अनासक्तीच्या पलीकडे जा, इथे स्वीकार व निषेध काहीच संभवत नाही.

जनका, हजारो मनुष्यांत एखाद्याच भाग्यवान पुरुषाच्या चित्तात वैराग्यप्रेम उदित होते. तेव्हा जगण्याची अगर मरण्याची इच्छाही त्याच्या ठिकाणी राहत नाही, तो उदासीन असतो. या अवस्थेला वैराग्य असे म्हणतात. वासना म्हणजेच संसार हे समजून तू वासनांचा त्याग कर. वासनात्याग करताच संसाराचाच त्याग होईल. मुख्य वासना तीन प्रकारच्या आहेत (१) स्वर्गादी उत्तम लोक प्राप्ती (२) मी सुंदर व मोहक असावे (३) मी पंडित व्हावे. या सर्वसामान्य वासना होत. या वासनांचा त्याग म्हणजेच उत्तम लोक, वैभव, संपत्ती, सौंदर्य, कीर्ती, पांडित्य ही सारी या वासनेत समाविष्ट असल्याने त्यांचा त्याग म्हणजेच वित्तेषणा, दारेषणा, लोकेषणा या तीनही ईषणांचा त्याग अभिप्रेत आहे.

या वासनाच बंध निर्माण करतात. मानव त्या बंधांत अडकतो व संसारचक्रात फसतो. मूळ कारण ज्या वासना, त्यांचाच त्याग केल्याने पुढील साऱ्या आपत्ती टळतात. म्हणून विवेकी माणूस इतर कोणत्याही त्यागापेक्षा वासनात्यागच करतो.

'जनका, अनेक आश्चर्यांनी ही सृष्टी भरलेली आहे. आश्चर्य नाहीसे झाले असता केवळ चैतन्यच राहते हे पाहून विवेकी शांत होतो. अधिष्ठानाचे स्वरूप ध्यानात आल्यावर त्यावरील आरोपित (अध्यस्त) वस्तूचा नाश होतो. विविधतेने नटलेली ही सृष्टी, सृष्टी न राहता आत्मज्ञानामुळे ती चेतन होते. तेव्हाच मनातील सारे संकल्प नाहीसे होतात. इथे नाश याचा अर्थ सत्ताशून्य असल्याचा प्रत्यय येणे व ते केवळ आभासमात्र आहे, बाकी काही नाही, याचा निश्चय होणे होय. नानाश्चर्य इदं विश्वं न किंचित् इति निश्चयी। स्फूर्तिमात्रःइव शाम्यति। ११.८'

जनका, विषयभावनेच्या ठिकाणी तू शून्यचित्त झालास म्हणजे तुझे म्हणून धन आहेच कोठे, मित्र तरी कोठे, शास्त्राचा तरी अभ्यास तो

कोणता आणि चिंतन तरी कोणाचे, कारण तुझी कशातच आस्था राहत नाही. क्व धनानि क्व मित्राणि, क्व शास्त्रं क्व च विज्ञान यदा मे गलिता स्पृहा। १४.२

जनका, तू पंचभूतात्मक देह नाहीस, कारण देह जड व अनित्य आहे. तू नित्य आणि चैतन्यस्वरूप आहेस. देहाशी तुझा काही संबंध नाही, 'असंगो हि अयं पुरुषः।' असे श्रुतीदेखील सांगते. साक्षी हा नेहमीच वस्तुभिन्न असतो. देहातील इंद्रिये, अहंकारादिक भाव यांचा तू साक्षी आहेस. हे जाणून सुखाने कालक्रमणा कर. 'चिद्रूपोऽसि सदा साक्षी निरपेक्षः सुखं चर।' १५.४ आजच देह जावो अगर कल्पान्तापर्यंत राहो वा आताच नाश पावो. देहामुळे तू मोठा वा छोटा होत नाहीस, कारण तून चैतन्यस्वरूप आहेस- 'देहः तिष्ठतु कल्पान्तं गच्छतु अद्यैव वा पुनः। क्व वृद्धिः क्व च वा हानिः तव चिन्मात्ररूपिणः।१५.१० जनका, देह असणे वा नसणे यावर तुझे अस्तित्व अवलंबून नाही. देह आहे म्हणून तू मोठा होत नाहीस व देह नाही म्हणून तुझा हलकेपणा म्हणजे क्षय होत नाही. तू देहाचा साक्षी आहेस, द्रष्टा नेहमीच दृश्याहून भिन्न असतो हा नियम आहे हे जाण.

तू शुद्ध एकमेव अद्वितीय, अव्यय, शांत चिदाकाश आहेस. तुला जन्म नाही मग कर्म तरी कोठून व अहंकार तरी कशाचा बाळगणार? 'कुतो जन्म कुतः कर्म कुतो अहंकार एव च।' १५.१३ हे जनका, तू विकाररहित आहेस. स्वगत वा विजातीय भेदापासून तू अलिप्त आहेस. चैतन्याने प्रकाशणारा व निर्मळ स्वरूपाचा तू आहेस. तुला जन्म-मरण, कर्म वा अहंकार काही संभवत नाही. हे सारे केवळ द्वैत बुद्धीत शक्य होते. आता द्वैत तुझ्यात नसल्याने कोणताही विकार संभवत नाही म्हणून तू पूर्ण अलिप्त आहेस. शुद्ध अंतःकरणामुळे तुझ्या ठिकाणी अहंकार तरी कोठून असणार? तू पूर्ण आनंदी आहेस.

जनका, तू अद्वय स्वरूपाचा झाल्याने ध्यान इत्यादी टाकून दे. आपल्या हृदयात कोणताही अन्यभाव ठेवू नकोस. तू सदैव मुक्त असल्याने चिंतन कसले करतोस? आपल्या आनंदस्वरूप आत्म्यात स्थिर होऊन राहणे ध्यानाशिवाय कसे जमेल म्हणून ध्यान केले पाहिजे, असा विचार जनका, तू करीत आहेस. मुनी याबद्दल त्याला सांगतात- आत्मबोध न झालेला व भेदाचाच विचार करणारा अशा व्यक्तीसाठी ध्यान आदी क्रिया उपयुक्त ठरतात. ध्यान हा मनोधर्म आहे. तू आत्मा आहेस, अनात्मा नाहीस. सदामुक्त रूप आहेस. ध्यानाने तू आता कोणती प्राप्ती करून घेणार? तू तर आप्तकाम आहेस. अपूर्णतेपासून तू अलिप्त आहेस. ही साधने काही मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या साधकांना उपयुक्त आहेत. तू पूर्ण आहेस. तुला काहीच मिळवावयाचे नाही. हेच ज्ञानाचे लक्षण. 'आत्मा त्वं मुक्त एव अस्ति किं विमृश्य करिष्यसि।'१५.२०

जनका, तुला तसे वाटत असेल तर तू सर्व कर्म करत राहा. जोवर तुझे चित्त वासनारहित आहे तोवर तुझ्या हातून कर्म घडत असतानाही तू कर्मबंधात अडकणार नाहीस. वासनाच बंधहेतु म्हणून उदासीन व विरक्तिपूर्ण होऊन व्यवहार करीत राहिलास तरी तू सुखी होशील. खुशाल तू भोगाचा आस्वाद घे, कर्म कर, समाधी लाव; तुझे चित्त आत्मज्ञानाने आशारहित झाल्याने कोणतेही कर्म तू

केलेस तरी तू बंधात सापडणार नाहीस.

भगवद्‌गीतेतही स्थितप्रज्ञ लक्षणेत असे म्हटले आहे- राग द्वेषवियुक्तैस्तु विषयान् इंद्रियैश्चरन्। आत्मवश्यैः विधेयात्मा प्रसादं अधिगच्छति। प्रेम वा तिरस्कार यांनी रहित असताना इंद्रिये विषयांचा आस्वाद घेत असतानाही मन आत्मवश असल्याने ते त्याही वेळी प्रसन्नच राहते. आनंद हाच त्याचा स्थायिभाव असतो.

जनका, तुला जर असे वाटत असेल माझा उपदेशक मोठा आहे, तरी त्याचा काय उपयोग? तुला साक्षात पिनाकपाणी, शार्ङ्गधर, वा ब्रह्मणस्पतीकडून ज्ञान मिळालेले असो; तू कदापि सुखी होणार नाहीस ! उपदेशक मोठा म्हणून तू सुखी होणार नाहीस; विषयाचा त्याग केल्यासच खरी शांती प्राप्त होईल. केवळ मोठा उपदेश असल्याने मला आत्मज्ञान होऊ शकेल या भावनेने भारून जाऊ नकोस. आत्मज्ञानासाठी संयम, विषयत्याग यांची नितांत गरज आहे. 'हरो यदि उपदेष्टा ते हरिः कमलजोऽपि वा। तथापि तव स्वास्थ्यं न सर्वं विस्मरणात् ।'१६.११ ज्ञानदेखील मिळालेले आहे ही गोष्ट विसरल्याखेरीज तू सुखी होणार नाहीस. ज्ञानाचा अभिमानही टाकून दे.

संन्याशाची लक्षणे सांगताना असे म्हटले आहे- 'सत्कार मान पूजार्थं दण्डकाषाय धारिणः। स संन्यासी न वक्तव्यः संन्यासी ज्ञान तत्परः।' काषाय (भगवी) वस्त्रे परिधान केलेली आहेत. स्वतःच्या सत्कारासाठी व मानसन्मानासाठी सतत हपापलेला आहे अशा व्यक्तीला संन्यासी म्हणू नये. जो ज्ञानाला सर्वश्रेष्ठ मानून त्याच्यातच रत झालेला असतो त्यालाच संन्यासी म्हणावे. कारण ज्ञानात् एव तु कैवल्यं असे आचार्य पुनः पुनः सांगतात.

जनका, आत्म्यातच जो रममाण होतो त्याचे विषयावाचून काही अडत नाही. हत्ती गोड पानेच खातो, कडुनिंबाची पाने तो कदापि खाणार नाही. सल्लकी पल्लव प्रीतं इव इभं निंबपल्लवाः। १७.३. इथे दृष्टान्त अतियोग्य असाच दिलेला आहे. आत्मरत माणूस परम आनंदाचा अनुभव घेत असल्याने क्षुद्र विषयानंदाची त्याला आवश्यकताच भासत नाही. नेहमी गोड पानेच खाणारा हत्ती कडू पानाकडे वळेल हे कदापि शक्य नाही.

जनका, सुख-दुःख आदी गोष्टी सापेक्ष आहेत; शिवाय ते मनाचे धर्म आहेत. ज्ञानी माणसाला आत्मवान असल्याची जाणीव असल्याने तो या मनोव्यापारापासून मुक्त असतो. व नित्य आनंदात विहार करतो. कारण ज्ञानी माणूस संसारातील सर्व गोष्टींबद्दल उदास असतो. उदारचित्तस्य हेयोपादेवता न हि।१७.६

जनका, जीवन्मुक्त वा मुक्तात्मा कोणत्याच बाबतीत परवश नसतो. तो इंद्रियांच्या मर्जीनुसार वागत नाही तर त्याच्या मर्जीप्रमाणे इंद्रिये वागतात. सामान्य माणूस बाह्य विषय पाहतो व त्याचे स्मरण करतो. ज्ञानी माणूस जागेपणीदेखील विषयासंबंधी झोपलेल्या माणसासारखा वागतो. उन्मीलती न मीलति वर्तते मुक्त चेतसः । १७.१०

जनका, विषयाबद्दल तिटकारा व विषयाबद्दल प्रेम या दोनही गोष्टी मनोधर्माच्या

आहेत. आत्मतत्त्वात रमून गेल्यामुळे ज्याचे मन विषयाच्या ठिकाणी अनासक्त झालेले आहे. त्या मनाला प्रेम व द्वेष धर्माने त्रास होत नाही. उलट जे काही प्राप्त होईल व होणार नाही त्याचा विचारही न करता यदृच्छेने जे काही वाट्याला आलेले आहे त्यातच ते मन आनंदी राहते. 'असंसक्तमनाः नित्यं प्राप्ताप्राप्तं उपाश्नुते।' १७.१७

मनात संकल्प या विकल्प स्फुरत नाही. स्त्रीपुत्रादिकामुळे मोह होत नाही. मन दिवास्वप्न पाहत नाही. मनात जडपणा निर्माण होत नाही. मनाचे मनपणच हरवून गेल्यामुळे मनाचे भाव तरी कुठून आणणार? ज्ञानी माणसाचे मन उन्मन झालेले असते. सर्व द्वंद्वाचा निरास झालेला असतो. श्रीदत्तात्रेयाच्या आरतीत असे म्हटले आहे-हारपले मन झाले उन्मन। मी तू पणाची झाली बोळवण। श्रीदत्ताच्या ठिकाणी ज्याचे चित्त लीन झाले त्याची स्थिती अशी होते असे जनार्दनशिष्य एकनाथ महाराज सांगत आहेत.

धनवान माणूस विपुल धन, स्त्रीपुत्र आदींसह सर्व उपभोग्य वस्तूंचा संग्रह करून उपभोगाने सुखी होण्याचा प्रयत्न करतो. आणि ज्ञानी माणसाकडे या सर्वच गोष्टींची वानवा म्हणजे अभाव असतो; तरीदेखील तो अत्यंत सुखी असतो. कारण या साऱ्या उपभोगक्षम सुखापेक्षा आत्मसुख हे सर्वश्रेष्ठ आहे अशी त्याची धारणा असते.

जनका, ज्याचे मन सर्व संकल्पविकल्परहित होऊन गेले आहे, त्याच्या ठिकाणी विक्षेप आढळणार नाही वा एकाग्रतेसाठी प्रयत्नही आढळणार नाही. विक्षेप असेल तरच निरोध करावा लागतो. सगळ्या वस्तुमात्राचे आत्यंतिक ज्ञान अगर त्याबद्दल मुग्धता ही दोन्ही राहत नाहीत. त्यामुळे विषयापासून सुख वा दुःख हीदेखील संभवत नाहीत. तो केवळ आत्मानंदात मग्न असतो. 'न सुखं न च वा दुःखं उपशान्तस्य योगिनः।' १८.१०

जनका, जगाचे अस्तित्व आहे, मी जग पाहत आहे, असे ज्याच्या मनाला वाटते तशी वासनाही त्याच्या ठिकाणी आढळते. तो जगाचे अस्तित्व कधीच नाकारणार नाही. जगासंबंधी कसलीच वासना नाही असा माणूस जग पाहत असतानादेखील आपण काही पाहत नाही, असेच म्हणेल; कारण त्याच्या मनात जगासंबंधी कोणताच संकल्प नसतो. गाढ निद्रेत मन संकल्पविकल्परहित असल्याने त्या वेळी त्या मनाला कसलाच बोध होत नाही. हा अनुभ्व प्रत्येकालाच आहे. हे जग मनोमय आहे. मनामुळेच जगाचे अस्तित्व आहे. 'स पश्यन्नपि न पश्यति।' १८.१५

जनका, अज्ञानी माणसाला चित्त स्थिर करण्यासाठी खटाटोप करावा लागतो. त्याला ते साध्य होत नाही. त्यासाठी त्याचे प्रयत्न चालूच राहतात; धारणा समाधीपर्यंत मजल गाठतो, समाधिस्थितीतून बाहेर पडताक्षणीच चित्त पूर्ववत संसारात मग्न होते. आत्मचिंतन करणारा योगी सदोदित आत्मस्थितीतच राहतो. म्हणजेच तो नित्य समाधी अवस्थेतच राहतो.- अष्टावक्र इथे साधनेची गौणता दाखवत नसून केवळ साधनेची कसरत करणारे जे लोक आहेत त्यांच्याबद्दलचे हे कथन आहे. आत्मरतीकडे नेणाऱ्या गोष्टीचा पाठपुरावा करावा आणि आत्मानंदाकडे विशेष दृष्टी असावी असे मुनी म्हणतात.

जनका, चिदात्म्याच्या केवळ श्रवणमात्रेकरून ज्याची बुद्धी शुद्ध अखंडाकार होते तोच आत्मस्थित होतो. तो शुभ वा अशुभ आचाराबद्दल उदासीन असतो. 'नैवाचारं अनाचारं औदास्यं वा प्रपश्यति।' १८.४८ आचार, अनाचार, शुभ-अशुभ या दोन्हीपलीकडे ज्याचे मन स्थिर झालेले असते तेच आत्मज्ञानी माणसाचे लक्षण आहे. कोणत्याही व्यवहारात गोंधळ, गडबड, घिसाडघाई, उतावळेपणा ज्ञानी माणसात आढळत नाही; अत्यंत कुशलतेने, दक्षतेने, धिमेपणानेच तो सर्व व्यवहार करत असतो. 'सुखं वक्ति सुखं भुङ्क्ते व्यवहारेऽपि शान्तधीः।' १८.५९

देह राहो किंवा जावो याची आत्मज्ञान्याला चिंता नसते. स्वभावतः भूमी हीच विश्रांतीचे स्थान असल्याने भूमीवर देह असणे वा भूमीत देह विरून जाणे यांत त्याला काही फरक जाणवत नाही. ज्ञानी माणूस देहाबद्दल कधीच फिकीर बाळगीत नाही. देह मूलतः व स्वरूपतः भूमी आहे. देह भूमीतच विलयन पावतो, तेच त्याचे विश्रांतीचे स्थान होय. 'स्वभावभूमि विश्रान्ति विस्मृताशेष संसृतेः। पततु उदेतु वा देहः न अस्य चिन्ता महात्मनः।' १८.८६ भूमी हेच देहाचे विश्रांतीचे स्थान; तिथे विश्रांती घेत असताना त्याला काळजी कसली? यालाच सर्वपाशापासून मुक्तता असे म्हटले जाते.

जनक म्हणतो, माझ्यातील द्वंद्वभावच नाहीसे झाल्याने शास्त्र, आत्म्याचे ज्ञान, विषयरहित मन, समाधान, तृष्णारहित अवस्था या साऱ्यांचा मला काही उपयोग नाही. माझ्या सगळ्या वासना शांत झाल्याने माझ्यात कोणतीच स्पृहा राहिलेली नाही. स्वरूपाला आणखी कोणते रूप संभवणार? ज्ञान, अज्ञान, मी, माझे, बंध व मोक्ष याला माझ्या दृष्टीने आता काहीच अर्थ राहिलेला नाही. 'क्व तृप्तिः क्व वितृष्णत्वं गत द्वंद्वस्य मे सदा। क्व बंधः क्व च वा मोक्षः स्वरूपस्य क्व रूपिता।' २०/२-३

निरुपाधिक शिवस्वरूपात अवस्थित असलेल्या मला उपदेश, शास्त्र, शिष्य, गुरू, पुरुषार्थ इत्यादी काही कळत नाही. निरुपाधेः शिवस्यमे क्व उपदेशः क्व शास्त्रं क्व शिष्यः क्व च वा गुरुः।२०.१३

हे मुने, माझ्यात आता कोणताच संकल्प उदित होत नाही. काय आहे काय नाही, एक वा दोन, मला काही माहीत नाही, यापलीकडे मी सांगू शकत नाही.

क्व च अस्ति क्व च वा नास्ति च एकं क्व च द्वयम्।
बहुता अत्र किं उक्तेन किंचित् न उत्तिष्ठते मम।
२०.१४

या दोन लेखांतून संक्षेपतः अष्टावक्र गीतेतील काही उपदेश-सार ग्रथित करून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या सारातून अष्टावक्र गीतेसंबंधी थोडी कल्पना येऊ शकेल. या गीतेत केवळ ज्ञानविचारच प्राधान्याने मांडलेला असल्याचे या विवेचनावरून ध्यानात येईल. तरीदेखील याबद्दल आपणां सर्वांना तीव्र जिज्ञासा निर्माण झाल्यास विस्तारपूर्वक सवडीनुसार विचार करण्यात येईल. आपली या ग्रंथाबद्दल जिज्ञासा निर्माण व्हावी हाच हे दोन लेख लिहिण्यामागील हेतू आहे.

**(इति शम्।)**

**कै. शं. बा. मठ**

●●●

# अध्याय १२ : सगुण भक्तियोग

सगुण आणि निर्गुण उपासना । यांच्या केले असे वर्णना ।। आणि गौरविले भक्तोत्तमांना । बाराव्या भक्तियोगांत ।।

**अर्जुनाची शंका :**

जे तुझी निरंतर सगुणभक्ती करिती । आणि जे अविनाशी निर्गुणाला भजती ।। कोण मानावा उत्तम यति । साकार निराकार पूजकांत ।।१।।

**श्रीभगवंतांचे विवरण :**

माझे स्वरूप तन्मय होऊन । पूजिती परम निष्ठा ठेवून ।। व्यक्त साकार ब्रह्म सगुण । ऐसे योगी सर्वश्रेष्ठ ।।२।।

अनिर्वाच्य, सर्वव्यापी, अव्यक्त । अचल, नित्य, अविकारी, अचिंत्य ।। ऐसे निर्गुण ब्रह्म सत्य । पूजिती जे श्रद्धेने ।। इंद्रियांचा निग्रह करिती । सर्वत्र समभाव राखिती । सदा सर्वांचे भले इच्छिती । तेही पावती मजप्रत ।।३-४।।

अव्यक्त ब्रह्माची करण्या साधना । अधिक क्लेश होती मानवांना ।। कारण अव्यक्ताची उपासना । स्थूल देहींना कठीण ।।५।।

सर्व कर्मे मजसी अर्पिती । अनन्यभावे मजला ध्याती । तल्लीन होवोनि भजन करिती । जाण पार्था, भक्त खरे ।।६।।

दुस्तर भवसागरातून । जन्म मरणाच्या फेऱ्यांतून ।। ऐसे भक्त त्वरा करून । उद्धरून नेतो मी ।।७।।

मन बुद्धी करी स्थिर । माझ्या दिव्य स्वरूपावर ।। स्वरूपीं होशील एकाकार । जाण पार्था, खरोखरी।।८।।

चित्त लावणे स्वरूपावरी । वाटेल तुजला कठीण जरी ।। इच्छा धरून प्रयत्न करी । प्राप्त करण्यासाठी मला ।।९।।

अभ्यास करण्या होसी असमर्थ । कर्मे करी माझ्या प्राप्त्यर्थ ।। करितां कर्मे केवळ मदर्थ । तरीही मिळेल ही सिद्धी।।१०।।

हेही करण्या असमर्थ जरी। कर्मयोगाचा आश्रय करी ।। मनावर ताबा ठेवून अखेरी । कर्मफलांचा करी त्याग ।।११।।

अभ्यासाहून श्रेष्ठ ज्ञान । ज्ञानाहून श्रेष्ठ असे ध्यान ।। कर्मफल त्याग श्रेष्ठ त्याहून । ज्याने लाभे चिरशांती ।।१२।।

ऐक माझ्या प्रिय भक्तांची लक्षणे । प्रेमळ, जगमित्र, दयाळू असणे ।। क्षमा करणे, अहंभाव सुटणे । सुखदुःख जो सम मानी ।।१३।।

संयमी, योगी सदा समाधान । मनबुद्धी करी मला अर्पण ।। दृढ निश्चयी, गुणसम्पन्न ।। तोचि भक्त प्रिय मला ।।१४।।

ज्याचा कोणा उपद्रव नसे । इतरांचा ज्याला त्रास नसे ।। हर्ष, क्रोध, भय, उद्वेग नसे । तोचि भक्त प्रिय मला ।।१५।।

निरपेक्ष, निर्मल, दुःखरहित । सावध, कर्तृत्वाभिमानरहित ।। अनासक्त , निर्विकार, सदोदित । तोचि भक्त प्रिय मला ।।१६।।

आनंद नाही, द्वेष नाही । शोक नाही, इच्छाही नाही ।। कर्मफलांचा करी त्यागही । तोचि भक्त प्रिय मला ।।१७।।

शत्रू मित्र, मान अपमान । एकच मानी शीत ऊन ।। सुख दुःख मानी समान । अभिलाषा नसे कशाचीही ।।१८।।

सम मानी निंदा स्तुती । मौनी, स्थिरबुद्धी, नसे आसक्ती ।। अल्पसंतोषी, मनी भक्ती । तोचि पुरुष प्रिय मला ।।१९।।

हा धर्म अमृतासमान । आचरती जे श्रद्धावान ।। भक्त ऐसे मत्परायण । अति प्रिय असती मला ।।२०।।

घडतां विश्वरूप दर्शन । अनन्य भक्तीने भरून ।। श्रद्धेने मन ओसंडून । अर्जुन पुढे प्रश्न करी ।।

कोणाचे देव सगुण साकार । कोणी भजती निर्गुण ॐकार ।। कोणता यांतील श्रेष्ठ प्रकार । सगुण भक्तियोग समाप्त ।।

।। **श्रीकृष्णार्पणमस्तु** ।।

**वा. प. पटवर्धन**

●●●

## -चाले दिंडी पंढरीला-



चाले दिंडी पंढरीला, भेटण्या पांडुरंगा ।
भक्तिरस नाचतसे, घेवूनी टाळ मृदुंगा ।। ध्रुपद

ज्ञानियांनी लावलेली,
विमल भक्तिज्योती ।
उजळूनी अंतरंगी,
वारकरी चालताती ।।
नामाच्या गजरात,
उधळती भक्तिरंगा ।। ध्रु

धुंदीत नामाच्या ते,
विसरती संसार ।
मनी आळविती सदा
विठ्ठल सर्वेश्वर ।।
रत्नाकरा भेटण्याला
धावे भक्तिगंगा ।। ध्रु

संत पालख्यांसवे,
मांदियाळी दिंड्यांची ।
सर नाही त्र्यभुवनी
या भक्तिवैभवाची ।।
चंद्रभागी वाळवंटी,
खेळण्यास नामरंगा ।।३।। ध्रु

नाही भेदभाव येथे,
जाती धर्म वर्णांचा ।
विठ्ठल विठ्ठल नाम सदा
घेई सर्व जनवाचा ।।
ज्ञानेश्वरी सवे गात
संतांच्या अभंगा ।।४।। ध्रु

आस विठ्ठल दर्शनाची
ध्यास घेई मन ।
आड न येई मार्गे
वादळ, पाऊस, ऊन ।।
देह जावो अथवा राहो,
भेटण्या श्रीरंगा ।।५।। ध्रु

ही कविता श्री. वसंत गोडबोले यांच्या मूळ हस्ताक्षरातली छापली आहे.

**वसंत गोडबोले**
१२४, शनिवार पेठ,
पुणे – ४११०३०

### प्रकरण ४३ वे

**११४ जितुकें कांहीं आपणासी ठावें। तितुके हळुहळु सिकवावे। शाहाणे करून सोडावे। बहुत जन ।।११४।। १९.१०.१४**

**११५ कीर्ती पाहता सुख नाहीं। सुख पाहातां कीर्ती नाहीं। केल्याविण कांहींच नाहीं। कोठें तऱ्ही ।११५।। १९.१०.२५**

संपूर्ण दासबोध ग्रंथातील शेवटच्या आधीचा म्हणजे हा १९ वा दशक व त्यातील १० वा समास राजकारण निरूपणानंतर 'विवेक' लक्षणांनी भरलेला आहे. सगळी कामे / कार्ये कशी विवेकाने, बुद्धिचातुर्याने, विचाराने अंगीकारावयाची व पूर्ण करण्यासाठी योजनाबद्ध कौशल्यपूर्ण विवेकावर आधारित आखणी करून निरनिराळ्या चालीरिती, धाटण्या /धारणा, परंपरा, शास्त्राधार, नाना तऱ्हेचे लोक, त्यांच्या चर्चा, वादविवाद, भक्तिमार्ग, उपासनामार्ग, नाना देशांचे नाना वृत्तीचे लोक, समुदाय, खाडेआखाडे, गर्वी-निगर्वी, स्पृश्य-अस्पृश्य, स्वजातीय-विजातीय अशा सर्व जनांची मने आपलीशी करावी; या सर्वांना श्रवण ज्ञान-साधनेत सामावून घ्यावे. सदासर्वकाळ समुदायाला सामावून समजून घ्यावे व साधकाला जे जे शक्य आहे, माहीत आहे, खात्री आहे, स्वतः अनुभवले आहे असे ज्ञान/ शिकवण सावकाश हळूहळू, युक्तिप्रयुक्तीने लोकांपर्यंत न्यावे, पसरवावे व त्याचा लाभ सर्वांनाच देऊन सन्मार्गी लावावे म्हणजेच शहाणे करावे. निद्रित अवस्थेतून जागृतावस्थेत, अंधारातून प्रकाशाकडे आणावे, अत्यंत सावधपणे!

असे कार्य करत असता जुन्या लोकांचा कंटाळा येईल, त्रास होईल तर नवीन साधक, नवीन प्रांत पाहावा. जुने लोक आळशी, ऐशआरामी, ऐतखाऊ वाटले /दिसले तर कार्यनाश होईल. याचा विचार शहाण्या साधकास सांगून जागृत करावे. सशक्तअशक्त या सर्वांचा योग्य उपयोग करून न्याय वाढवावा व आनंदात कालक्रमण करावे. योग्य सत्संगतीत राहावे. या भौतिक खटाटोपामुळे कीर्ती होईल; पण अखंड धडपडीमुळे आंतरिक सुख मिळणार नाही व सुखात, ऐशआरामात स्वतःपुरतेच स्वार्थाने राहिलात तर कीर्ती होणार नाही. काहीतरी विशेष करून दाखविण्याची धडपड, धमक, प्रयत्न प्रत्येक मनुष्याने केले पाहिजे. उगाचच आपणांला अशक्त, दुबळा, असमर्थ समजू नये. असा जर धीर सोडला तर संसार कसा तरून जाणार? स्वामी स्वरूपानंद म्हणतात, ''आपणाशी जरी लेखशील क्षुद्र तरी अभद्र पाठिशी लागे.''

धीर सोडून काय होणार, जे भोगायचे ते भोगावेच लागणार व कर्मानुसार, प्रारब्धानुसार भोग भोगावेच लागतील. हे सर्व जो शहाणा आहे, विवेकी आहे, तोच साधक आपले जीवन सार्थकी लावेल. कवी नारायण म्हणतो, ''आणिले बांधून सारे ते इथे भोगावयाचे...''

''भोग भोगूनच संपवावेत.'' स्वामी स्वरूपानंद; स्वतःचे भोग भोगून त्यांनी एक आदर्शच साधकांसमोर ठेवला.

**मोहन लिमये**
बी ३, अक्षय सोसायटी, सिटी पोस्टासमोर,
पनवेल, जि. रायगड - ४१० २०६
दूरध्वनी : ०२२-२७४५ २०३२

## मानवी जीवनात धर्म व विज्ञानाची आवश्यकता

**वसंत गोडबोले**

जगविख्यात शास्त्रज्ञ डॉ. अल्बर्ट आइन्स्टाइन यांनी म्हटले आहे की ''धर्माविना विज्ञान लंगडे व विज्ञानाविना धर्म आंधळा आहे.'' सहजरीत्या जरी विचार केला तरी हे सहजी लक्षात येईल की या विचाराद्वारे त्यांनी जीवनात धर्म व विज्ञान या दोहोंची आवश्यकता आहे, पण तीसुद्धा परस्परपूरक अशीच हेच सांगितले आहे. नुसता धर्म वा नुसते विज्ञान जीवनाला फुलवू शकले तरी ते फुलणे अर्धवट असते, समतोल नसते आणि त्यातूनच अनर्थकारी अधोगतीप्रत नेणारी शक्तिबीजे समाजाला नष्ट करण्यास कारणीभूत होतात. जीवन हे एक देह, आत्मा, मन यांचे संयुग आहे आणि या संयुगाला बुद्धी मिळाली की बुद्धिसजीव सृष्टी /जीवन बनते आणि बुद्धीमुळेच मानवी जीवन, इतर सजीवांवरच नव्हे निसर्गशक्तींवर आधिपत्य गाजवीत आहे आणि इतर सजीवांवर मानवाला विजय मिळाल्याने सर्व सजीव सृष्टीत त्याचे जीवन प्रथम क्रमांकाचे आहे आणि येथेच त्याच्या जीवनास एक कलाटणी मिळणारी स्थिती प्राप्त झाली. एक संभ्रमावस्था प्राप्त झाली व त्यातून जीवनप्रवाह विघटित होऊन त्याचे वहन दोन प्रमुख दिशानुवर्ती झाले व ते प्रवाह परस्परविरुद्ध निर्माण झाले. एक प्रवाह केवळ विज्ञानानुवर्तीच झाला तर दुसरा सनातनी देवदैववादी. यांच्या विचारप्रणाली एकमेकांच्या इतक्या विरोधात होत्या की त्यांच्या संघर्षाचे परिणाम समाजपुरुषाच्या प्रकृतीस विघातक ठरून समाजाला एक संभ्रमावस्था प्राप्त झाली. निश्चित कोणत्या प्रणालीची कास धरावी हे समर्थपणे, छातीठोकपणे सांगणारी शक्ती, नेतृत्व उभेच राहिले नाही आणि जे नेतृत्व होते व आहे ते सोईस्करपणे दोन्ही दगडांवर पाय ठेवणारे होते व आजही आहे. त्यामुळे या दोन्ही धर्म व विज्ञान प्रणालींचा समन्वयित मार्ग दाखविणारे नेतृत्व अभावानेच उपजले. वास्तविक या दोन्ही प्रणालींचा सम्यक अभ्यास करून त्याने समाजप्रबोधन करणारे अभावानेच आढळतात व जे थोडे आहेत त्यांच्यापाशी आर्थिक पाठबळ, राजाश्रय व यंत्रणा नसल्याने त्यांचा आवाज लुप्त होतो या संभ्रमाच्या कोलाहलात. जीवन धर्म व विज्ञान या दोन्हींवर चालते का याचा परामर्श घेण्यासाठी प्रथम या दोन्ही प्रणालींचा मागोवा संक्षिप्तपणे / संक्षेपाने घेऊ व त्यानंतर त्यांच्यात सामान्य दुवा वा सीमारेषा कोठे आहे ते बघू.

अतिप्राचीन काळी मानवाला निसर्गातील अनेक गूढ प्रमेये माहीत नसल्यामुळे पंचमहाभूतांविषयी एक अनामिक भीती व त्यातूनच पुढे देववादाचा उदय झाला. देवदेवतांबरोबरच मग त्यांचे पूजातंत्रविधान इ. अनेक प्रकारचे वाङ्मय निर्माण झाले, तंत्र निर्माण झाले, मंत्र निर्माण झाले व एक शास्त्र उदयास आले ते म्हणजे ''धर्मशास्त्र''. यात जीवनाला एका विशिष्ट पद्धतीच्या आचार, आहार व विचारसरणीच्या आकृतिबंधात बसविण्यात आले. असे अनेक तऱ्हेचे आकृतिबंध समूहाप्रमाणे निर्माण झाले. त्यांच्यातही संघर्ष झाले, सरमिसळ झाली, शकले झाली, काहींचा लय झाला तर काही उदय पावले. धर्मसत्ता मानवी जीवनावर अधिराज्य करू लागली. धर्ममार्तंडांचा उदय झाला व त्यांनी जे काही मान्य केले, जे दंडक घालून दिले, जे विचार, जी प्रणाली मान्य केली त्याविरुद्ध कोणी ब्र काढल्यास त्याला शिक्षा होऊ लागली व त्यामुळे

समाजपुरुष धर्मसत्तेच्या आदेशांवर, प्रणालीवर जगू लागला. विज्ञाननिष्ठांची एक प्रकारे गळचेपीच होऊ लागली व अनन्वित छळामुळे त्यांना सत्यशोधन विज्ञानाद्वारे सिद्ध करूनही ते चूक आहे हे सांगणे भाग पडू लागले. एवढी दहशत या धर्ममार्तण्डांनी या समाजजीवनात निर्माण केली. परिणामी अंधश्रद्धांचा पगडा समाजजीवनावर विलक्षण बसून विज्ञान सूर्यप्रकाश झाकोळला गेला. प्रख्यात शास्त्रज्ञ गॅलिलिओचे उदाहरण यास साक्षी आहे. या अतिरेकी विचारप्रणालीमुळेच विज्ञानाची मुस्कटदाबी झाली. परिणामी समाजवृक्षाला अंधश्रद्धेची कीड लागली व तो पोखरला जाऊ लागला. समाजाचे शोषण धर्मपिपासूंकडून होऊ लागले. धर्माच्या वेडापायी शास्त्रांकडे पाठ फिरवून बसणे भाग पडले. सर्व गोष्टी देव व दैवाधीन, कर्ताकरविता परमेश्वर, दैववादित्व व परिणामी त्याचे प्रचारक महंत, भोंदू साधू इ. ची चलती झाली. आजही ग्रामीण भागात नरबळी, पशुबळी इ. व देवदासींसारख्या प्रथांचा समाजमानसावरील पगडा यत्किंचितही कमी झाला नाही हे उघड सत्य आहे. विज्ञानज्ञानाऐवजी नवससायास, व्रतवैकल्ये, ज्योतिष, बलिदान, सती जाणे इ. अनेक विघातक पाखंडी प्रथा यांचा प्रचंड सुळसुळाट होऊन अनेक मठमठ्या, बुवा, महंत इ. नी समाजजीवन व्यापून टाकले. अशाही परिस्थितीत समाजाला विज्ञानाभिमुख करून धर्माच्या अनिष्ट जोखडापासून मुक्त करण्यासाठी स्वामी विवेकानंद, आगरकर, म. फुले, डॉ. आंबेडकर, राजा राममोहन रॉय इ. अनेक समाजधुरीणांनी प्रचंड शारीरिक, आर्थिक व मानसिक आघात सोसून प्रयत्न केले. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, गाडगे महाराज इ. अनेक संतांनी, रामदासांसारख्या द्रष्टचा संतांनी संतवाणीद्वारे खरा धर्म आणण्यासाठी समाजास प्रवृत्त केले. समाजप्रबोधन केले. काळाच्या बदलत्या गतीप्रमाणे व विज्ञानप्रणालीचा समाजजीवनावर हळूहळू परिणाम होऊ लागल्याने अति देव / दैववादाचे विष हळूहळू उतरू लागले. समाजपरिवर्तन होऊ लागले. पण या परिवर्तनाला केवळ विज्ञानप्रणालीच कारणीभूत ठरली असे नाही तर राज्यकर्ते बदलले; नवी राजवट येत गेली व ती राजवट विज्ञानबळावर प्राप्त शस्त्र, अस्त्र, सामर्थ्य यांनी युक्त असल्याने आपोआपच समाजमन प्रथम कुतूहल, मग जिज्ञासा व मग अंगीकार अशा क्रमाने विज्ञानमय होऊ लागले. पण पूर्वीची धर्म, देवदैववादाची पाळेमुळे एवढी खोलवर रुजली आहेत की हे समाजपरिवर्तन विज्ञानमय होत असतानाही समाजपुरुषाचे मन अंतर्यामी दैवदेववादीच राहिले. एक मुखवटा असा दुतोंडी स्वरूपाचा, समाजपुरुष घालू लागला. वरपांगी विज्ञाननिष्ठा दाखविणारे, विज्ञानाची कास धरा सांगणारे आतून कर्मकांडवादीच राहिले. त्यामुळे राजाश्रित असे नवे महंत, साधू, संत उभे राहिले. त्यांचे आश्रम म्हणजे राजकारणाचे अड्डे बनले. त्यामुळे समाजपुरुषाच्या रक्तातील एक विष उतरू

लागले न लागले तोच एक नवे विष त्यात भिनू लागले व समाजजीवन विज्ञानाचे अभिशापही वरदायी फलांबरोबरच भोगू लागले. महाभयंकर शस्त्रास्त्रे, हत्यारे, रसायने यांची निर्मिती करून विज्ञानाचा उपयोग संहारक, आघाती शक्तिवर्धनासाठी करण्याचे राजकारण्यांचे स्वप्न साकार होऊ लागले व महायुद्धे भडकून संपत्ती, मानववंश यांचा महाभयंकर संहार जगाला भोगावा लागला. निसर्गाचा समतोल बिघडला. प्रचंड प्रदूषण, नीतिमूल्यांचा ऱ्हास करणारी साधने, भोगलोलुपतेस खतपाणीच घालणारे नवे शोध, नव्या प्रणाली यांनी समाजाची चौकटच पूर्णपणे मोडकळीस येऊ लागली. भ्रष्टाचाराचे, वाममार्गाचे नवे विज्ञाननिर्मित व विज्ञानाधिष्ठित मार्ग समाजधुरीणांनी अवलंबल्यामुळे समाजास क्षय लागला. संभ्रमावस्थेच्या नव्या चक्रवातात समाज सापडला आणि आज आपणांवर विचार करण्याची वेळ आली आहे की धर्म आणि विज्ञान यांची सीमारेषा निश्चित करूनच एका नव्या आकृतिबंधाची निर्मिती करून त्यात समाजजीवनास बसवून सुविहित प्रगती करायची ती कशी आणि त्यासाठी प्रथम धर्म व विज्ञान यांचे कार्यक्षेत्र, व्याप्ती, स्वरूप इत्यादींचा संक्षिप्त ऊहापोह करू या.

डॉ. अल्बर्ट आइन्स्टाइनच्या लेखारंभी उद्‌धृत उक्तीवर विचार केला तर असे लक्षात येईल की त्यांनी धर्म नको असे म्हटले नाही. म्हणजेच धर्म व विज्ञान या दोहोंची आवश्यकता त्यांनाही अभिप्रेत होती व त्यांच्या मर्यादाही त्यांनी जाणल्या होत्या. मानवी जीवन वा समाजजीवन यांस दोन तऱ्हेची गरज असते. एक भौतिक प्रगतीची व दुसरी सांस्कृतिक मनोव्यापाराची. विज्ञान व धर्म यांत येथेच मोठा फरक आहे मूलभूत स्वरूपाचा. मनाचे संस्कृतिकरण धर्म करू शकतो, तर भौतिक प्रगतीची दालने विज्ञानानेच उघडू शकतात/मिळतात. "शरीर + आत्मा = जीवन" असे समीकरण मांडले तर लगेच लक्षात येईल की विज्ञान शरीर म्हणजे भौतिक गोष्टीशी तर धर्म आत्म्याशी म्हणजे आध्यात्मिकतेशी निगडित आहे. आत्म्याची प्रगती म्हणजे बुद्धीचे विकसन, संवर्धन, संगोपन व संचलन म्हणजे संस्कृतिकरण होय जे केवळ निकोप धर्मशास्त्रच करू शकते. मनाचे संवर्धन त्यावर उत्तम संस्कार केल्यास सुयोग्य होऊन उत्तम सुसंस्कृत नागरिक निर्माण होऊ शकतात.

विज्ञानाची आजची प्रगती सर्व क्षेत्रांतील, सर्वांना माहीत आहेच. अगदी अंतराळात मानव चंद्रावर उतरवून तेथे वसाहत करण्यापर्यंतच्या मजलीची. त्याविषयी वेगळे लिहिण्याचे कारण नाही आणि तो या लेखाचा विषय नाही. करोडो कोसांवरची माणसे दृक्‌श्राव्य संपर्कयंत्रणेद्वारे जवळ आणली, अगदी पूर्ण असा यंत्रमानव निर्माण केला तरी पण माणसांमध्ये जिव्हाळा, बंधुभाव, प्रेम, माया, मानवता, सज्जनता विज्ञान निर्माण करू शकले नाही. यंत्रमानव स्वतःहून

विचार करू शकत नाही. त्यामुळे सर्व विज्ञानाविष्कार जीवनावर काय परिणाम करतील ते मानवी बुद्धीच ठरविते व त्याप्रमाणे वापर करते. ही विज्ञानाची लक्ष्मणरेषा आहे व येथेच विज्ञान संपते. विज्ञान शरीरासाठी शरीर निर्माण करू शकेल, पण चैतन्य / आत्मा / मन निर्माण करू शकणार नाही हे सत्य आहे. विज्ञान साधन देईल, पण साध्य ठरविणारी बुद्धी देऊ शकणार नाही. बुद्धीने विज्ञान निर्माण होईल, पण विज्ञानाने बुद्धी निर्माण होणर नाही. तेव्हा विज्ञान हे साधन चैतन्य आत्मारहित असल्याने त्याची मर्यादा सहजपणे लक्षात घेतल्यावर आता प्रश्न आहे तो आत्म्याच्या/ मनाच्या संस्करणाचा. त्यासाठी केवळ एकच शास्त्र आहे ते म्हणजे धर्मशास्त्र / धर्म. जेथे विज्ञान संपते तेथेच अध्यात्म सुरू होते. विज्ञाननिर्मित साधने ही मनविरहित म्हणजे त्यांमध्ये स्वयंभू उपजत बुद्धी नसलेली असतात. त्यामुळे ती स्वतःहून स्वतंत्र स्वयंभू असा विचारच करू शकत नाहीत. त्यामुळे मानव त्यांचा वापर कसा करतो त्याप्रमाणे फळ मिळेल हे उघड आहे. तेव्हा साध्य ठरविणे व त्यासाठी विज्ञान प्रयोगित करणे हे मनाच्या म्हणजेच मानवाच्या बुद्धीवर अवलंबून आहे. तेव्हा मनावर जसे संस्कार करू त्याप्रमाणे ते सुमती वा दुर्मती नागरिक निर्माण करील. हे काम फक्त धर्म / धर्मशास्त्राचेच आहे. धर्मशास्त्रात नीतिशास्त्र, समाजशास्त्र, तर्कशास्त्र, वेगवेगळ्या संहिता, उपनिषदे इ. चे विभाग आहेत. त्यांत विज्ञाननिष्ठ बदल आणून वा जे विज्ञानाने शोधले ते अंगीकारून निर्मल वस्तुनिष्ठ शास्त्रे जर शिकविली गेली, सदाचार, सन्नीती, मानवता, परोपकारित्व, अहिंसा, प्रयत्नवाद, सहिष्णुता, बंधुभाव, सौहार्द इ. चे पाठ नीट शिकवले गेले तर ती मानवी मने असलेलेच खऱ्या अर्थाने डोळस श्रद्धा असलेले सुजाण नागरिक बनतील. पूर्वीपासून एक म्हण आपणांस माहीत आहे. ''जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धरी'', पण सुजाण नागरिकत्वाचा विचार करता असे म्हणावेसे वाटते की ''ज्या सुजाणाहाती विज्ञानाची दोरी तोच जगाला उद्धरी''. पण सुजाण नागरिकत्वाचा विचार करता असे लक्षात येते की सुजाण नागरिकांचीच गरज आहे. तेव्हा हे उघड आहे की विज्ञान मानवाच्या बुद्धिमत्तेतून निर्माण झालेले असले तरी मानवी मनाचे संस्करण ते करू शकत नाही. मेंदूचे ऑपरेशन विज्ञान करू शकेल, पण मेंदूचा वापर करण्याची बुद्धी व चैतन्य नाही निर्माण करू शकणार. हाच मूलभूत मोठा फारक आहे धर्म व विज्ञानामध्ये.

आता जीवन जगणे म्हणजे भौतिक व मानसिक अशा दोन्हींचे संतुलन अत्यावश्यक आहे. विज्ञान असंस्कृत स्वार्थी सत्तालोलुपांच्या हाती पडले तर त्याचा दुरुपयोग होणार हे निश्चित. त्यामुळे मानवी जीवन खाईत लोटले जाईल. तेव्हा मन सुसंस्कृत करण्यासाठी डोळस श्रद्धा हवी ती धर्म देतो. फक्त तो धर्म विज्ञानाधिष्ठित हवा. कालबाह्यता, अंधश्रद्धा जोपासणारा नको. ''जे सिद्ध ते

स्वीकार्य'' असा लवचीक हवा. धर्म म्हणजे आचारनियम, संहिता, श्रद्धा व सद्‌सद्‌विवेकबुद्धिमय दृष्टिकोन असे समजले तर मनासाठी धर्मच उपयुक्त पर्याय आहे. एकमेव पर्याय आहे. मनाला तामस, राजस वा सात्त्विक बनविणे हे धर्माचे काम आहे. मनाला राजस वा तामस बनविणारा धर्म विनाशाला कारणीभूत होतो. सात्त्विक धर्म हवा. ''विनाशकाले विपरीत बुद्धी'' म्हणजे बुद्धी विपरीत झाली की विनाश. तेव्हा बुद्धीस वळण लावून ती प्रगल्भ अशी करण्याचे शास्त्र धर्मच. विपरीत बुद्धीनेच महाभारत घडले, रामायण घडले, महायुद्धे झाली, धर्मयुद्धे झाली. आजही अनेक ठिकाणी धर्माची शकले पडून त्यांतील जीवघेणे संघर्ष चालूच आहेत. कारण धर्माची नशा चढल्याने एकधर्मतत्त्वे विसरली गेली हे होय.

समाजाला प्रगती हवी तर विज्ञानाशिवाय पर्याय नाही आणि सभ्य संस्कृतिमय मनासाठी धर्माशिवाय अन्य पर्याय नाही. तेव्हा जीवनरथ सरळ चालण्यासाठी कुशल सारथ्य हवे व ते धर्म देऊ शकतो, पण धर्म भौतिक शास्त्रांची प्रगती देऊ शकत नाही. म्हणूनच ''धर्म हा विज्ञानहीन असेल तर तो आंधळा आहे व विज्ञान सुसंस्कृत धर्मशास्त्राशिवाय लंगडे आहे'' या त्या थोर शास्त्रज्ञाच्या उक्तीतच दोन्हींचा समन्वय हवा हे सांगणारे सत्य आहे. ''न हि ज्ञानेन सदृशं पवित्रं इह विद्यते'' हे जरी खरे असले तरी ''योजकस्तत्र दुर्लभः'' हेही खरे आहे आणि म्हणूनच समाजाला या दोन्हींचा समन्वय देणारी यंत्रण हवी, नेतृत्व हवे तरच सुजलाम सुफलाम जीवन शक्य आहे.

मानवी जीवनास धर्म आणि विज्ञान दोन्ही अत्यावश्यक आहेत. केवळ एकच प्रणाली जीवनास सर्वस्वी निरुपयोगी आहे कारण त्यामुळे काय झाले व प्रगत राष्ट्रांत आजही काय होत आहे ते आपण प्रत्यही पाहत आहोत. ही दोन्ही शास्त्रे मानवी जीवनाची चाके आहेत व ती योग्य तेवढ्या मापाची समसमान ठेवली तरच मानवाचा जीवनरथ समतोल धावणार आहे. तेव्हा हा समतोल ठेवणे व रथ हाकणे हे कुशल सारथ्याचे लक्षण आहे. अन्यथा एकांगीपणाने विनाशच हे नक्की.

मानवी जीवनाला यासाठीच धर्म व विज्ञान दोन्ही हवे. एक समन्वयित परिपाक हवा या दोन्ही प्रणालींचा; आणि म्हणून सुसंस्कृत विज्ञानाधिष्ठित डोळस धर्मश्रद्धा + धर्ममूल्यांनी संस्करित बुद्धिधर्माने प्रयोगित विज्ञान म्हणजे निरामय, सुजलाम, सुफलाम, संतुष्ट प्रगत मानवी जीवन. म्हणूनच धर्म व विज्ञान यांचा असा सुविहित उपयोगाचा प्रयत्न हवा. कारण दोन्हीशिवाय जीवन एककल्ली होईल म्हणून. हेच डॉ. अल्बर्ट आइन्स्टाइन या थोर शास्त्रज्ञाच्या उक्तीचे मर्म. हीच ती मर्मबंधातली ठेव.

**आचार्य वसंत गोडबोले**
रिटायर्ड डेप्युटी डायरेक्टर
सायंटिस्ट 'ई' डिफेन्स आर.डी.सर्व्हिस
१२४, शनिवार पेठ, (नेने घाट),
पुणे - ४११०३०
मो. : ९४२३८५८८२३

# वैदिक वाङ्मयाचा विस्तार व त्यात उपनिषदांचे स्थान व गीतेचे महत्त्व (उत्तरार्ध)

प्र. सि. मराठे

या लेखाच्या पूर्वार्धाशी सलगता साधण्यासाठी पूर्वार्धाच्या शेवटच्या परिच्छेदातील आशयाचा परामर्श घेऊन उत्तरार्धाची सुरुवात करीत आहे.

## आरण्यके व उपनिषदे

निरनिराळ्या ब्राह्मणग्रंथांत यज्ञयागादिकांवर, त्यांतील निरनिराळ्या विधींच्या तपशिलावर व त्यांतील उपचार करताना म्हणण्याच्या मंत्रावरच मुख्यतः आशय मांडला गेला आहे. त्यांत 'वेदान्त' तत्त्वज्ञानावर विशेष भाष्य आलेले दिसत नाही. परंतु म्हणून तत्त्वज्ञानाची उत्पत्ती ब्राह्मणकालानंतर झाली असावी असे मानणे योग्य नाही. वेदांतील तत्त्वज्ञानात्मक सूक्तांवर विचार करून त्यावर विश्लेषण करणारे ब्रह्मवादीही ब्राह्मणकाळात त्यांच्या कार्यात व्यस्त होते. यज्ञशास्त्राची प्रगती होत असताना त्याच काळात काही तात्त्विक विचारही प्रगल्भ होत जात होते. यज्ञांतील पौरोहित्य जरी ब्राह्मणवर्गाकडे असले तरी यज्ञाचे यजमान असलेल्या क्षत्रियांमध्येही आत्मज्ञान झालेले कित्येक राजे त्या वेळी होते असे इतिहास सांगतो. अशाच काही ब्रह्मर्षी राजर्षींनी वैदिक तत्त्वज्ञानाचा परामर्श घेणरे लेखन केले, तेही काही ब्राह्मणग्रंथांत शेवटी (परिशिष्ट स्वरूपात) समाविष्ट केले गेले. त्यांना आरण्यके अशी संज्ञा प्राप्त झाली. आरण्यके म्हणजे वानप्रस्थाश्रमात, अरण्यवासी असताना अध्ययन करण्याचे ग्रंथ. या आरण्यकांमधील मुख्य विषय म्हणजे यज्ञयागादी कृत्ये किंवा त्यांचे विधिवत आचरण व त्यांचे नियम वगैरे नसून यज्ञाची मूलतत्त्वे, त्यांतील गूढार्थ व वेदान्त तत्त्वज्ञान हे होत. आरण्यकांत सर्व विश्वाच्या आदितत्त्वाच्या संदर्भातील तत्त्वज्ञानाचाच बहुतांश परामर्श घेतलेला आढळतो. या आदितत्त्वाविषयीच्या तत्त्वज्ञानाला, सर्वभूतांच्या ठायी ब्रह्मतत्त्वच अंगरूपाने आत्म्याच्या स्वरूपात वास्तव्य करीत असते या मूलसिद्धान्ताची जोड मिळून यज्ञविषयांपासून अगदी वेगळे असे तत्त्वज्ञाननिरूपण करणारी उपनिषदे त्रिकालज्ञानी ऋषिमुनींनी रचली. संन्याशांनी शेवटच्या आश्रमात अध्ययन करण्याची जी काही धर्मवचने आहेत त्यांनाच अंशतः जोडलेली व आरण्यकांत अंशतः अंतर्भूत असलेली काही प्राचीन उपनिषदे आहेत. पुष्कळ अंशी ह्यांनाच 'वेदान्त' अशी संज्ञा दिली जाते. नंतरच्या काळातील तत्त्वज्ञांच्या मताप्रमाणे, ही उपनिषदांतील तत्त्वे म्हणजे वेदांचा शेवटचा भाग नसून ती वेदांचे 'अंतिम ध्येय' होत. आरण्यके व अशी प्राचीन उपनिषदे ही वेदान्त या नात्याने वेदांच्या विविध शाखांत समाविष्ट केलेली आढळतात. अशी उपनिषदे ही त्या त्या वेदांच्या ब्राह्मणांची अंशभूत अंगेच होत आणि ज्या वेदाच्या ब्राह्मणग्रंथात ती समाविष्ट झाली त्या वेदांतर्गत ती समजली जातात. जसे ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणग्रंथात समाविष्ट असलेले ऐतरेय उपनिषद् ऋग्वेदांतर्गत समजले जाते. किंवा शुक्लयजुर्वेदाच्या शतपथब्राह्मण ग्रंथात शेवटी आलेले बृहदारण्यक

उपनिषद् हे शुक्लयजुर्वेदांतर्गत समजले जाते. अशी ह्या प्रकारची उपनिषदे (ब्राह्मणकालातील) अतिशय जुनी म्हणजे प्राचीन आहेत व ती उपनिषदांच्या (एकंदर चार वर्गांपैकी)पहिल्या वर्गात मोडतात. अशी ही सहा उपनिषदे खालीलप्रमाणे आहेत.

१) बृहदारण्यक उपनिषद् – शुक्ल्यजुर्वेदांतर्गत

२) छांदोग्य उपनिषद् – सामवेदांतर्गत

३) तैत्तिरीय उपनिषद् – कृष्णयजुर्वेदांतर्गत

४) ऐतरेय उपनिषद् – ऋग्वेदांतर्गत (ऐतरेय ब्राह्मणात)

५) कौषीतकी उपनिषद् – ऋग्वेदांतर्गत (कौषीतकी ब्राह्मणात)

६) केन उपनिषद् किंवा तलवकार उपनिषद् – सामवेदांतर्गत (जैमिनीय किंवा तलवकार आरण्यकात)

तैत्तिरीय आरण्यकाला मागाहून जोडलेले 'महानारायण उपनिषद्' खेरीजकरून वर सांगितलेली सहा उपनिषदे ही ह्या जातीच्या ग्रंथांत जुन्यात जुनी आहेत व त्यांच्या कालानुक्रमानेच ती वर दिली आहेत. ही उपनिषदे बहुतेक गद्यात आहेत व ती ज्या ब्राह्मणग्रंथांत समाविष्ट आहेत त्यांच्याच भाषाशैलीत रचलेली ती भासतात. वर निर्दिष्ट केलेल्या उपनिषदांत अर्धे केन उपनिषद् फक्त वृत्तबद्ध असून ते अगदी अखेरचे आहे. (सहाव्या क्रमांकावर)

ह्या प्राचीन उपनिषदांशी संलग्न भासणारी आणखी काही उपनिषदे पुढल्या काळात ऋषिमुनींकडून रचली गेली. ती वेदांच्या ब्राह्मणग्रंथांत प्रत्यक्ष समाविष्ट नसली तरी रचनाकारांच्या वेदपंथाप्रमाणे ती त्या त्या वेदांतर्गत समजली जातात. ही उपनिषदे वृत्तबद्ध असून त्यांत (आरण्यकांप्रमाणे) यज्ञयागादिकांच्या गूढ तत्त्वांचा मुळीच उल्लेख नाही. यज्ञयागांना वगळून, वेदान्त/तत्त्वज्ञानाच्या इतर पैलूंवरच यांत विवेचन आहे. वेदान्त तत्त्वज्ञान जाणून घेण्याच्या दृष्टीने ही वृत्तबद्ध उपनिषदे फार महत्वाची आहेत. अशी ही पाच उपनिषदे उपनिषदांच्या दुसऱ्या वर्गात मोडतात व ती खालीलप्रमाणे आहेत. 'ईश' व 'कठ' यांसारखी प्रवृत्तिपर आणि अतयंत महत्त्वाची उपनिषदे याच वर्गातील आहेत.

७) काठक उपनिषद किंवा कठोपनिषद् – कृष्णयजुर्वेदांतर्गत समजले जाते.

८) ईशावास्य उपनिषद् – शुक्लयजुर्वेदांतर्गत समजले जाते.

९) श्वेताश्वतर उपनिषद् – कृष्णयजुर्वेदांतर्गत समजले जाते.

१०) मुण्डक उपनिषद् – अथर्ववेदांतर्गत समजले जाते.

११) महानारायण उपनिषद् – कृष्णयजुर्वेदांतर्गत (तैत्तिरीय आरण्यकात) समजले जाते.

उपरिनिर्दिष्ट उपनिषदांखेरीज काही उपनिषदे रचली गेली व तीसुद्धा विशिष्ट वेदांतर्गत समजली जातात. ही सर्व गद्यात लिहिलेली असून त्यांच्या भाषाशैलीवरून ती वरील उपनिषदांच्या नंतरच्या काळात रचली असावीत असे दिसून येते. ती उपनिषदे अशी –

१२) प्रश्नोपनिषद् – अथर्ववेदांतर्गत समजले जाते.

१३)मैत्रायणीयोपनिषद् – कृष्णयजुर्वेदांतर्गत समजले जाते.

१४) माण्डुक्योपनिषद् – अथर्ववेदांतर्गत समजले जाते.

वरील उपनिषदे उपनिषदांच्या तिसऱ्या वर्गात मोडतात.

वरील तीन वर्गांतील १४ उपनिषदे जरी निरनिराळ्या काळी रचली गेली असली तरी ती उपनिषदीय वाङ्मयाच्या उगमस्थानी असून सनातन धर्माची वेदान्ततत्त्वे यांत उत्तम तऱ्हेने प्रतिबिंबित झालेली दिसतात. भारतीय सनातन धर्माच्या तत्त्वज्ञानाचा विषय निघाला तर हीच १४ उपनिषदे आपल्या दृष्टीसमोर उभी राहतात. खरी वेदान्ततत्त्वे याच उपनिषदांतून निरुपिलेली आपल्याला आढळतात. वरील १४ उपनिषदांतही खालील दहा उपनिषदे प्रमुख मानली जातात व त्यांना 'दशोपनिषद्' अशा सामूहिक नावाने ओळखले जाते.

**ती प्रमुख उपनिषदे अशी–**

१) ईश अथवा ईशावास्य २) केन ३) कठ ४) प्रश्न ५) मुण्डक ६) मांडुक्य ७) तैत्तिरीय ८) ऐतरेय ९) छांदोग्य १०) बृहदारण्यक

**अथर्ववेदीय उपनिषदे –**

उपनिषदांचा आणखीही एक चौथा वर्ग आहे. ही सर्व उपनिषदे अथर्ववेदानंतरच्या काळातील आहेत. अशी उपनिषदे २०० च्या वर आहेत. या उपनिषदांचा वैदिक पंथांशी काहीच संबंध असेल असे म्हणता येत नाही. परंपरेप्रमाणे ही सर्व उपनिषदे मात्र अर्थववेदांतर्गत मानली जातात. या उपनिषदांत श्रौतधर्माबाहेरील विषयांवर, नीतिशास्त्रावर व त्याच्या व्यावहारिक पैलूंवर निरनिराळ्या तत्त्वज्ञांची आणि निरनिराळ्या पंथांची मते व विचार मांडले गेले आहेत. अथर्ववेदाचेही पहिल्या वेदत्रयीपेक्षा असेच वेगळेपण असल्यामुळे अशी सर्व उपनिषदे भारतीयांच्या परंपरेप्रमाणे अथर्ववेदाशी संबंधित किंवा अथर्ववेदांतर्गत मानली गेली असावीत.

असे जरी असले तरी वेदांतील ज्ञानकाण्डावर प्रकाश टाकणारी, वैदिक तत्त्वज्ञानाची ओळख करून देणारी व 'वेदान्त' ही सामूहिक संज्ञा लाभलेली म्हणून जेव्हा उपनिषदांचा उल्लेख होतो, तेव्हा तो या १४ मुख्य उपनिषदांना उद्देशूनच अभिप्रेत असतो, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

वेद, ब्राह्मणे, आरण्यके आणि उपनिषदे हा वैदिक वाङ् मयाचा क्रम आहे. उपनिषदे जरी वैदिक वाङ्मयाच्या शेवटी आली असली तरी तत्त्वज्ञानाच्या बाबतीत शिरोभागी आहेत. रूढार्थाने वैदिक वाङ्मयाचा पसारा या क्रमाने मानला जात असला तरी अगदी प्राचीन उपनिषदे रचली जात असताना किंवा त्यापूर्वीही भारतात अगदी समांतर रितीने सहा शास्त्रांची (दर्शने) रचनाही काही असामान्य सिद्धमुनींकडून केली जात होती.

**ही सहा शास्त्रे (षड्दर्शने) अशी –**

१) सांख्य २) वैशेषिक ३) न्याय ४) पूर्वमीमांसा ५) उत्तरमीमांसा व ६) योग

यांतील कपिलमुनीप्रणित सांख्यशास्त्र हे सर्वांत आधीचे (प्राचीन) व वेदान्त तत्त्वज्ञानाला निगडित असे प्रमुख आहे. क्षराक्षर सृष्टीचे विश्लेषण करून त्यावरून काही सिद्धान्त

सांगणाऱ्या वेदान्तशास्त्राला समांतर अशी सांख्य, वैशेषिक व न्याय ही दर्शने आहेत असे म्हणता येईल. त्यांतील वैशेषिक व कणादन्यायमतांचा जरी कोणत्याही शिष्ट व प्रमुख वेदान्त्यांनी स्वीकार केला नाही, तरी कपिलसांख्यशास्त्राचे बरेच सिद्धान्त मन्वादिक स्मृतिग्रंथांतून व गीतेतही आले आहेत. अर्थात प्रकृती आणि पुरुष दोन्हीही स्वतंत्र, स्वयंभू आहेत. हा अखेरचा सांख्यसिद्धान्त मात्र वेदान्ताला मान्य नाही. असे जरी असले तरी तत्त्वज्ञानाचा आशय व त्यातील गूढ तत्त्वे यांचे वैज्ञानिक पद्धतीने विश्लेषण करून, निरीक्षण-तर्क-अनुमान या उपचारांनी सोपपत्तिक पद्धतीने अगदी असंदिग्धपणे सूत्ररूपात सांगण्याचा उपक्रम प्रथमच कपिलमुनींनी त्यांच्या मूळ आख्यानग्रंथात केला होता. अशा रीतीने 'सम्यक् ख्यानम्' म्हणून कपिलतत्त्वज्ञानाला 'सांख्य' असे नाव मिळाले असावे असे काही लोक मानतात. अध्यात्मविषयावर या पद्धतीने भाष्य करणारे पहिलेच म्हणून कपिलमुनींना 'आद्यदार्शनिक' व त्यांच्या सांख्यशास्त्राला सर्वांत प्राचीन दर्शन मानले जाते. पुढे तर सांख्य शब्दाचा, ज्ञानाच्या समानार्थी शब्द म्हणून वापर होऊ लागला व ज्ञानयोगाला 'सांख्ययोग' अशी संज्ञा प्राप्त झाली. गीतेतही दुसऱ्या अध्यायाला सांख्ययोग असे नाव दिले आहे व पुढे तिसऱ्या अध्यायाला 'ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम्' याप्रमाणे ज्ञानमार्गाला 'सांख्य' व कर्ममार्गाला 'योग' या नावांनी संबोधिले आहे. गीतेत १० व्या अध्यायात, प्रत्यक्ष भगवंताने 'सिद्धानां कपिलो मुनिः' असे सांगून कपिलमुनींचा गौरव केला आहे. यावरून कपिलमुनींच्या अपार योग्यतेची कल्पना प्रत्ययास येते.

या षड्दर्शनांच्या बरोबर त्याच कालात, अध्यात्मशास्त्रांतील व नीतिशास्त्रांतील विविध तत्त्व-नियमांचा प्रात्यक्षिक पद्धतीने निर्देश करणाऱ्या कथांनी भरलेल्या अठरा पुराणांची व इतिहासग्रंथांचीही निर्मिती झाली.

वेदोत्तर कालौघात निरनिराळी उपनिषदे रचली जात असताना दुसरीकडे समांतर रितीने लिहिल्या गेलेल्या दर्शन-पुराणादी ग्रंथांचा प्रभावही विविध उपनिषद्कारांवर पडला असणार आणि त्यामुळेच वेदांतील ज्ञानकाण्डातील आशय उपनिषदांतून आपल्याला जास्त चांगल्या रितीने समजू शकतो.

वेदांची भाषा आर्ष आहे. त्यामुळे संस्कृत जाणणाऱ्या पंडितांसही ती आज दुर्बोध आहे. त्या मानाने उपनिषदांची भाषा बरीचशी पाणिनी-संस्कृतच्या जवळची वाटते. कालौघाप्रमाणे त्यांची भाषा संस्कृतच्या जास्त जास्त जवळ येत जाते व भगवद्गीता-उपनिषदांची भाषा तर शुद्ध संस्कृत बनते. म्हणून वेदांतर्गत आध्यात्मिक तत्त्वज्ञान जाणून घेण्यास आज उपनिषदेच त्यातल्या त्यात जास्त सोयीची आहेत. आणि म्हणूनच त्यांना 'वेदान्त' ही सामूहिक संज्ञा प्राप्त झाली आहे.

वेदांतील कर्मकाण्डांत निरनिराळे ऐहिक कामोपभोग मिळवण्यासाठी सांगितलेल्या यज्ञविधींचेच आकर्षण जनमानसात स्थिर झाले आणि वेदांतील यज्ञविधींचाच प्रसार व प्रभाव लोकांच्यात रुजलात व वेदांतील ज्ञानकाण्डातले तत्त्वज्ञान मात्र लोकांच्या नजरेआड होऊ लागले. वेद म्हणजे यज्ञविधींचे कर्मकाण्ड अशीच सामान्य

जनांची समजूत असे. वेदांतील ज्ञानकाण्डातले वैदिक तत्त्वज्ञान, जे लोकजन यज्ञविधींतच गुंतून राहिल्यामुळे त्यांच्यापासून दूर राहिले होते, ते तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोचविण्याचे पवित्र कार्य त्या काळच्या ऋषिमुनींनी निरनिराळी उपनिषदे रचून केले असेच म्हणावे लागेल. वेदांतील तत्त्वज्ञानावर भाष्य करणाऱ्या उपनिषद्कारांना, वेदोत्तर काळात समांतर रितीने निर्माण झालेल्या षड्दर्शने व इतिहास-पुराणे या ग्रंथांतील आशयाचाही उपयोग झाला असल्याने, त्यांनी रचलेली उपनिषदे, वेदांतील मूळ आशयापेक्षाही जास्त समृद्ध झाली असून त्यामुळे लोकांना ती जास्त ज्ञानसुबोध झाली आहेत.

या उपनिषद्-समूहात एकाच आचार्याचे किंवा एकाच पंथाचे तत्त्वज्ञान किंवा विचार आहेत असे नाही, कारण ही उपनिषदे निरनिराळ्या ऋषींनी निरनिराळ्या काळात लिहिली आहेत. अर्थात मूळ वैदिक आशयाचे सूत्र पकडूनच ती लिहिली असल्यामुळे त्यांत बऱ्याच अंशी सादृश्य दिसले तरी त्यांत अनेक तऱ्हेचे विचार आले असून त्यांपैकी काही दिसण्यात परस्परविरोधीही आहेत. हा विरोध काढून टाकून सर्व प्राचीन उपनिषदांचा समन्वय करून त्यांच्यात एकवाक्यता दाखवून देण्यासाठी बादरायणाचार्यांनी वेदान्तसूत्रे रचली. त्यामुळे उपनिषदांइतकीच वेदान्तसूत्रेही या बाबतीत प्रमाण धरली जातात. या वेदान्तसूत्रांना 'ब्रह्मसूत्रे' किंवा 'शारीरक सूत्रे' अशाही दुसऱ्या संज्ञा आहेत.

उपनिषदे ही प्रायः संसारत्याग केलेल्या अरण्यवासी ऋषिमुनींनी लिहिली असल्यामुळे ती बहुतेक वैराग्यपर म्हणजेच निवृत्तिपर असल्याचे भासते. त्याला ईशकठादी काही मोजकीच उपनिषदे अपवाद म्हणता येतील. वेदान्तसूत्रे मुख्यतः उपनिषदांची एकवाक्यता करण्यासाठीच रचलेली असल्यामुळे तीही प्रायः निवृत्तिपरच भासतात. कारण त्यांतही वैदिक प्रवृत्तिमार्गाचे कोठेही सविस्तर प्रतिपादन केलेले दिसत नाही. श्रीवेदव्यासविरचित (कृष्णमुखीं घातलेल्या) भगवद्गीतेत मात्र प्रथमच प्रवृत्तिमार्ग प्रतिपादन झाल्यामुळे ही उणीव भरून निघाली असे म्हणावे लागेल. वेदान्तसूत्रांतील धार्मिक तत्त्वज्ञानाची पूर्तता करणारा ग्रंथ या नात्याने भगवद्गीता ही वेदान्तसूत्रांइतकीच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त सर्वमान्य व प्रमाणभूत मानली जाऊ लागली. कारण मोहवश व शोकसंविग्नमानस झालेल्या अर्जुनाला युद्ध उभे राहिले असताना त्याचे धर्मकर्तव्य दाखवून देऊन त्याला युद्धासाठी कार्यप्रवृत्त करण्यासाठी कृष्णाने वेदविद्येतील प्रवृत्तिमार्ग गीतारूपाने उलगडून दाखविला होता. वेदांतील ज्ञानकाण्डातले गूढ आध्यात्मिक तत्त्व उलगडून दाखविणाऱ्या, उपनिषदे, वेदान्तसूत्रे आणि भगवद्गीता या त्रयीला 'प्रस्थानत्रयी' असे नाव प्राप्त झाले. निवृत्ती व प्रवृत्ती या दोन्ही मार्गांचे तात्त्विक विवेचन करणारे, वैदिक धर्माचे हे तीन मुख्य आधारस्तंभ आहेत. वेदान्त तत्त्वज्ञान जाणून घेण्यासाठी आजच्या घडीला जिज्ञासूंना उपनिषदे हाच मूलस्त्रोत उपलब्ध आहे. प्राचीन भाषेतील उपनिषदांचा अभ्यास करून त्यांच्यात मेळ घालत बसण्याची तसदी घेण्याचीही आता सामान्य वाचकांना गरज भासणार नाही. कारण या सर्व उपनिषदांचा समन्वय करून सामान्य प्रापंचिकासाठी प्रवृत्तिमार्ग उलगडून दाखवून त्यांना त्यांचे आचरणकर्तव्य अगदी असंदिग्धपणे

प्रतिपादित करणारी कृष्णमुखातून निघालेली वेदव्यासविरचित भगवद्‌गीता आता त्यांना (आपणां सामान्य प्रापंचिकांना) उपलब्ध आहे.

'सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतम् महत् ।।'

सर्व उपनिषदे याच कोणी गायी, त्या गायींना पान्हा फुटण्यासाठी जणू पाडस (वत्स) म्हणजे बुद्धिमान अर्जुन आणि त्या गायींचे दूध काढणारे गवळी म्हणजे साक्षात श्रीकृष्ण असा त्रिवेणी संगम घडून आल्यावर जे दूध एकत्र झाले ते म्हणजेच 'गीतामृत' असे गीताध्यानात आलंकारिक वर्णन आले आहे. भगवद्‌गीतेत सर्व उपनिषदांचा समन्वय साधला आहे इतकेच नव्हे तर वेदान्ताशी जुळणाऱ्या कपिलसांख्य सिद्धान्ताचा स्वीकार करून, प्रकृती/पुरुष यांसंबंधी वेदान्त व सांख्य यांच्यात असलेल्या विरोधी विचारांचासुद्धा पुरुषोत्तमयोग सांगून समन्वय दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. भगवद्‌गीता शुद्ध संस्कृत भाषेत असून सर्व वेदान्त तत्त्वज्ञानाचे जणू सारच म्हणजे सर्व उपनिषद्‌विचारांना एकत्र घुसळून त्यांचे काढलेले नवनीतच आहे. निरनिराळ्या प्रकृतीच्या मानवांसाठी निरनिराळे मोक्षमार्ग दाखवून सामान्य प्रापंचिकास योग्य अशी राजविद्याही ९ व्या अध्यायात प्रतिपादित केली आहे. वैदिक (सनातन) धर्माच्या निरनिराळ्या पंथांच्या संस्थापकांनी गीतेच्या आधारानेच निरनिराळे धर्मग्रंथ लिहिले आहेत व त्यांत आपल्या प्रतिपादनाला गीतेचाच आधार कसा आहे हेच दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व भारतीय भाषांमध्येच नव्हे तर ग्रीक, लॅटिन, जर्मन फ्रेंच, इंग्रजी वगैरे पाश्चिमात्य भाषांतूनही गीतेची भाषांतरे होऊन या अप्रतिम दैवी ग्रंथाची प्रसिद्धी आज जगभर झाली आहे. शोपेनहॉवर, कांट एमरसन आदी पाश्चात्त्य तत्त्वज्ञांनीसुद्धा गीतेचे अद्धितीयत्व मान्य केले आहे. अशा या सर्व उपनिषदांचे नवनीत मानलेल्या भगवद्‌गीतेलाही (प्रत्येक अध्यायाच्या इतिश्रीमध्ये) उपनिषद हीच संज्ञा दिली गेली आहे. इतकेच नव्हे तर 'भगवद्‌गीतासु उपनिषत्सु' अशा आदरार्थी बहुवचनाने तिला संबोधिले आहे.

वेद व उपनिषदे यांतील आशयाचा समन्वय साधून सर्व वेदांचेच जणू सार किंवा नवनीतच गीतारूपाने भगवंताने काढून दिले ही गोष्ट सर्वमान्य आहेच; परंतु ज्ञानोबा हेच सत्य, ज्ञानेश्वरीच्या पहिल्या प्रास्ताविक ओव्यांत, 'वेदार्थाचे लोणी व्यासांनी, ज्ञानाच्या शेगडीवर विवेकाची आच देऊन कढवून जे खमंग साजूक तूप तयार केले ते म्हणजेच ही भगवद्‌गीता', असे वर्णन करून सांगतात.

सर्व वेदान्त मंथूनी व्यासांच्या तीव्र बुद्धिने ।
नवनीत जणू गीता-रूपें अद्‌भुत काढिले ।।५१ ।।
(अध्याय १)

नवनीत ठेवुनी हेची ज्ञानाच्या शेगडीवर ।
विवेक आचें कढले खमंग तूप साजुक ।।५२ ।।

शेवटी अठराव्या अध्यायात तर ज्ञानोबा 'गीता हे वेदांचे (वेद-ज्ञानाचे) मूळ बीजच आहे' असे वर्णन करतात. वेद हे अतिप्राचीन आणि गीता ही तर द्वापार युगातील म्हणजे खूपच अलीकडील आहे. तर मग गीता हे वेदांचे मूळ कसे अशी शंका श्रोत्यांच्या मनात येणे साहजिक आहे असे सांगून ज्ञानेश्वर महाराज त्या शंकेचे

निराकरणही करतात.

वस्तूचा नाश ना होता राही विस्तार संग्रहीं।
सूक्ष्मरूपात ज्यामध्ये म्हणती त्यास बीजची।।अ.१८/१४३०।।

जैसा बीजामधे वृक्ष लघुरूपेच तो स्थित।
तैसे त्रिकांड ते वेद गीतेंतच संकुचित।।१४३१।।

गीता म्हणून वेदांचे बीज (मूळ) माझे असे मत।
दिसण्यासारखे आहे ते कोणालाहि स्पष्टच।।१४३२।।

**उपसंहार :–** वेदांतील कर्मकाण्ड भागात, निरनिराळ्या कामोपभोग-फलप्राप्तीसाठी सांगितलेले यज्ञविधीच लोकप्रिय झाल्यामुळे, वेदांतील तत्त्वज्ञान-आशयाला समाज दुरावत जात असताना, ते दिव्य तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोचविण्याचे महत्त्वाचे कार्य पप्रचीन उपनिषदांमुळे शक्य झाले. परंतु काही मोजक्या उपनिषदांचा अपवाद वगळता बहुतेक उपनिषदांचे प्रतिपादन निवृत्तिपरच आहे असे भासते. निरनिराळ्या काळात निरनिराळ्या ऋषिमुनींनी रचलेल्यर उपनिषदांतील काही ठिकाणी दिसणारा विरोधाभास काढून टाकून त्यांचा समन्वय साधण्यासाठी, बादरायणाचार्यांनी रचलेल्या ब्रह्मसूत्रांतही प्रवृत्तिमार्गाचे व्हावे तसे प्रतिपादन झाले नव्हते. त्यामुळे सामान्य प्रापंचिकांना योग्य असे आचारमार्गदर्शन ब्रह्मसूत्रांतही मिळत नव्हते. ही त्रुटी भरून काढण्यासाठी व सामान्य संसारी माणसास संसारात पुढे आलेली कर्तव्ये करूनसुद्धा परमार्थ साधण्याची युक्ती म्हणजेच राजविद्या (राजगुह्ययोग) प्रतिपादन करण्यासाठीच श्रीवेदव्यासांनी सर्व उपनिषदांचे जणू नवनीतच अशा भगवद्‌गीता-उपनिषदांचे रसायन तयार केले असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. त्यामुळे सामान्य माणसास केवळ गीतेचा अभ्यास करून आणि त्यांतील गुह्य तत्त्वांचा आचार व त्यांचे फळ प्रात्यक्षिकरीत्या समजवून सांगणाऱ्या महाभारतातील कथा वाचून, अथांग वैदिक तत्त्वज्ञानाला गवसणी घालण्याचे श्रेय मिळविण्याची सोय महाभारत ग्रंथामुळे व त्यात समाविष्ट असलेल्या भगवद्‌गीतेमुळे झाली आहे.

**टीप :–** उपनिषद् शब्दाची व्युत्पत्ती:-

उपनिषद् हा शब्द 'उप+नि+सद्' (म्हणजे कोणाच्याजवळ खाली बसणे) या धातूपासून निघाला आहे. गुह्यज्ञान मिळविण्यासाठी शिष्य दृढ श्रद्धेने गुरूंच्या पायाजवळ (खाली) बसल्यावर गुरू जे दिव्यज्ञान शिष्याला देतो ते उपनिषद् असा अर्थ उपनिषद् या शब्दात अभिप्रेत आहे. भारतीय परंपरेप्रमाणे उपनिषद् हा शब्द 'रहस्यम्' (गुह्यज्ञान) या शब्दाशी समानार्थक आहे. उपनिषदांच्या ग्रंथांतून 'इति रहस्यम्', 'इति उपनिषद्' या शब्दांचा पर्यायाने उल्लेख केलेला आढळतो.

**प्र.सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूज (पूर्व),
मुंबई – ४०००५५
दूरध्वनी – ०२२ – २६६७२२०५

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

पेलण्याच्या क्षमतेचा कधीच विचार केला गेला नाही. उलट दिसेल त्या जागेवर, अगदी नदीच्या पात्रातही, शहरनियोजनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून बांधकामे करण्यात आली. याकरता लागणाऱ्या साधनांकरता जंगलतोड करण्यात आली. नदीच्या प्रवाहांवर बंधारे बांधण्यात आले. या सर्वांना ''अर्थ'' हेच कारण होते. सहल कंपन्यांनी आपली दुकाने थाटली. श्रद्धेचा बाजार मांडून जास्तीत जास्त लोकांना अशा स्थळांकडे आकर्षित केले जाऊ लागले. स्थानिक जनतेनेही या सगळ्या व्यवहारांकडे आर्थिक लाभाच्या दृष्टीनेच पाहिले. यामध्ये 'धर्म' किंवा 'श्रद्धा' याला व्यापारापलिकडे काहीही अर्थ नव्हता. तेथे राहणारे आणि नवीन येणारे सर्व बहुतांशी हिंदूच आहेत. फलाविना कर्म, निरपेक्ष दान, आणि साधे राहणीमान ही हिंदू धर्माची वैशिष्ट्ये आहेत. निसर्गाच्या सर्वच व्यक्तआणि अव्यक्त शक्तींची हिंदू पूजा करतो. वास्तविक ही पूजा म्हणजे या शक्तींचा आदर करणे हे असताना त्याची जागा आता बाह्य निरुपयोगी कर्मकांडांनी घेतली. ही कर्मकांडेही हा आदर व्यक्त करणारी साधने होती; व्यापाराची संधी नव्हती. माणसाला अंतर्मुख बनवणारी, त्यांच्यातील विवेक जागृत करणारी, घेण्यापेक्षा देण्यावर भर देणारी मानसिकता निर्माण करणे, हे हिंदू धर्माचे अंतिम उद्दिष्ट आहे. निर्वाण, मुक्ती, समाधी यांच्याकडे जाण्याकरता कराव्या लागणाऱ्या तयारीचा तो भाग आहे. तो व्यापार नसल्याने श्रद्धेला तेथे स्थान आहे. ही श्रद्धा माणसाला अंतर्मुख करते, समर्पणाला तयार करते. दुर्दैवाने श्रद्धेच्या या ''अर्था'' ला आज त्यामध्ये अपेक्षित असलेल्या विचारांच्या विरुद्ध 'परिमाणे' प्राप्त झाली आणि हीच खरी शोकान्तिका आहे.

दूरदर्शनावरील एका वाहिनीने केदारनाथ येथील शंकराचार्यांची मुलाखत घेतली. हे मंदिर चहूबाजूंनी भाविकांच्या शवांनी वेढले गेले होते. यामुळेच शंकराचार्य सांगत होते की या देवळाची शुद्धी करून घेण्यात येईल. वास्तविक कोणतेही हिंदू देऊळ हे अस्वच्छ होऊ शकते, पण अशुद्ध होऊ शकत नाही. वास्तविक निश्चल प्रेतांपेक्षा, भ्रष्टाचार, व्यभिचार व स्वार्थाने बरबटलेला जिवंत माणसांच्या वावरामुळेच ही मंदिरे अधिक अशुद्ध होत असतात. श्रद्धेचा व्यापार करणारे तेथील बडवे क्षणाक्षणाला तेथील मंदिर अपवित्र करीत असतात. शंकराचार्य किंवा धर्म मार्तंडाचे काम, निदान हिंदू धर्मात तरी, मानवाला या स्खलनापासून वाचवण्याचे असते. संवेदनाशून्य, बधिर जिवंत माणसांपेक्षा प्रेते कमी धोकदायक असतात. सरकार हे लोकांचे प्रतिनिधत्व करते. भ्रष्ट समाजाचे नेते स्वच्छ असूच शकत नाहीत. खरी आपत्ती आहे ती हिंदूच्या आजच्या मानसिकतेची, हे ज्या दिवशी आपण ओळखू त्यावेळी नैसर्गिक आपत्ती जरी थांबवू शकलो नाही, तरी त्याच्या विध्वंसाची तीव्रता तरी नक्कीच कमी करू शकू! ही आपत्ती आणि विध्वंस ही या केदारनाथाने श्रद्धेचा व्यापार करणाऱ्या, संवेदना शून्य आणि बधिर समाजाला दिलेली शिक्षा आहे, एवढाच 'अर्थ' यातून निघू शकतो.

●●●

**संपादकीय** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर

**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे – ४०० ६०१.

**मुद्रण स्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१.